# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०९ जुलै, २०१८ / आषाढ १८, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**<br>**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) पर्यावरण मंत्री**<br>**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८२**

---

### राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत

**(१) * ४१२६९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३८१४१ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००५ पासून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांच्या भरतीला बंदी घातली असून सेवानिवृत्त, राजीनामा, अकाली मृत्यू यामुळे खाजगी शाळेतील अनेक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत समिती गठीत करण्यात आली होती, सदर समितीने दिलेला अहवाल मंजूर करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आकृतिबंध मंजूर नसल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती मागील अनेक वर्षे बंद असल्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलने केली वा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आकृतिबंध मंजूर करुन शिक्षेकेतर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतिबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील शासनमान्य व अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदावर नियुक्ती करताना गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * ४२३८९ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनमान्य व अनुदान प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या रिक्त पदावर नियुक्ती करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देवू नये असा आदेश शासनाने दिनांक २ मे, २०१२ रोजी दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाला न जुमानता संस्था चालकांनी रिक्त जागेवर नियुक्त्या करुन जिल्हा शिक्षणाधिकारी आणि विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी या नियुक्त्यांना मान्यता प्रदान केल्या असून रिक्त जागेवर नियुक्ती करण्यासाठी मंत्रालयस्तरावरून ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश देण्यात आले असून हे आदेश देण्यासाठी प्रत्येकी रुपये १ लाख घेण्यात आले तसेच प्रस्ताव कार्यालयामार्फत न येता मध्यस्थामार्फत मंत्रालयात सादर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तत्कालिन शिक्षण आयुक्त श्री.भापकर यांनी सुमारे ५९ शिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून या कारणे दाखवा नोटीसच्या आधारे पुढील शिस्तभंगाची कारवाई रोखण्यासाठी प्रत्येकी रुपये ३० ते ४० लाख घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणात जिल्हा शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण आयुक्त व शिक्षण सचिव कार्यालयात करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या संपूर्ण प्रकरणात दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम-१९७७ मधील तरतूदीनुसार अतिरिक्त शिक्षकांचे पूर्णपणे समायोजन होईपर्यंत ना-हरकत प्रमाणपत्र देवू नये असा निर्णय शासनाने घेतला होता.
(२) शासन निर्णय दिनांक ०६/०९/२०१२ व दिनांक ०६/०५/२०१३ अन्वये दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या शासन निर्णयामधील पद भरती बंदीमध्ये सवलत देण्यात आली होती. त्यानुसार रिक्त जागांवरील नियुक्त्यांना मान्यता प्रदान करण्यात आल्या आहेत.
(३) प्रकरणी शिक्षणाधिकारी सदर (प्राथमिक)-६१, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)-७२ व विभागीय शिक्षण उपसंचालक-९ यांना ज्ञापन देण्यात आले होते.

(४) हे खरे नाही.

(५) सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## शिधापत्रिकाधारकांना आधारकार्डविना धान्य देण्याबाबत

**(३) * ४१७१२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वस्त धान्य विभागनिहाय ४२ जिल्हयांमध्ये आधार क्रमांकावर आधारित संगणकीय धान्य वाटप योजना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केली तसेच स्वस्त धान्य दुकानातून गोरगरीबांना वाटप करावयाच्या धान्यांसाठी पॅनकार्ड, आधारकार्ड, बायोमॅट्रीक अशा हायटेक योजना लागू करण्यात आल्या असून सदर योजनेचा शिधापत्रिकाधारकांना लाभ व त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येत आहे,

(२) तसेच मुंबई शहरातील ५४ लाख शिधापत्रिकाधारकांपैकी २१ लाख ८२ हजार ५२५ शिधापत्रिकाधारकांचे तसेच ठाणे, कळवा, मुंब्रा आणि भिवंडी (जि.ठाणे) भागातील शिधापत्रिकाधारकांचे शिधापत्रिका आधारकार्डशी लिंक करण्यात न आल्याने त्यांना धान्य मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी ठाणे जिल्हयातील शिधावाटप कार्यालयातील उपनियंत्रक अधिकारी यांची भेट घेऊन दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शिधापत्रिका आधारकार्डला लिंक करण्याची सक्ती नको असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असून शासन त्यास सक्ती करीत आहे, तसेच, शिधापत्रिका आधारकार्डला लिंक करण्याचे काम केवळ ५० टक्के पुर्ण झाले असून स्वस्त धान्य दुकानातील ई-पॉस मशीन बंद पडल्याने राज्यातील रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड इत्यादी जिल्हयातील गोरगरीबांना शिधावाटप दुकानातून धान्याचे वाटप करण्यात अडचणी निर्माण झाल्या असून ई-पॉस मशीन बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिधापत्रिकाधारक मुलभूत अन्नधान्याच्या हक्कापासून वंचित राहत असल्याने त्यांच्या अन्नधान्यांचा प्रश्न सोडवून त्यांना आधारकार्डविना धान्य देण्याबाबत तसेच ई-पॉस मशीनऐवजी पर्यायी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१), (२), (३), (४) व (५) ई-पॉस मशीनद्वारे धान्यवाटप व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २ फेब्रुवारी, २०१८, दिनांक १२ एप्रिल, २०१८, दिनांक २० एप्रिल, २०१८ व दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार सर्व जिल्हयात ई-पॉस मशीनमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास त्याचे वेळीच निराकरण केले जाते.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र तसेच रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड जिल्हयांमध्ये कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ, ठाणे यांची दिनांक १२ एप्रिल, २०१८ च्या दरम्यान कार्यालयात भेट घेतली हे खरे आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागात अनिवासी क्रीडा प्रबोधनी सुरु करण्याबाबत

**(४) * ४२५१२ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण व सोयी सुविधा मिळण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यात अनिवासी क्रीडा प्रबोधनी सुरू करण्याचा निर्णय घेवूनही विदर्भात नागपूर विभागात अनिवासी क्रीडा प्रबोधनी सुरू करण्यात आले नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनिवासी क्रीडा प्रबोधनी सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड, वाडा व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गावांमधील नळ पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५) * ४१९०१ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड, वाडा व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून तालुक्यातील काही गावांत ४० ते ५० दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक असून नदी-नाले आटण्यास सुरुवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा (जि.पालघर) तालुक्यातून भातसा, तानसा, वैतरणा, पिंजाळ व देहार्जे या चार बारमाही नद्या वाहत असताना देखील तालुक्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांना केवळ प्रशासनातील नियोजनाच्या अभावामुळे माहे फेब्रुवारी महिन्यापासूनच पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विक्रमगड तालुक्यातील दहा ग्रामपंचायतीसाठी राबविण्यात आलेली नळ पाणीपुरवठा योजना मागील अनेक वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असून त्यापैकी ६ योजना १३ वर्षापासून तर ४ योजना ६ वर्षापासून प्रलंबित असून या योजनांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपूर्ण योजनांच्या संदर्भात स्थानिक नागरीकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे अनेकवेळा तक्रारी, लेखी निवेदने देवूनही जिल्हा परिषद त्याकडे दुर्लक्ष करीत आहे तसेच वाडा तालुक्यातील अनेक नळ पाणीपुरवठा योजना ठेकेदारांची मुजोरी आणि पाणीपुरवठा विभागातील अधिकारी तसेच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजनेची अपूर्ण असलेली कामे पूर्ण करुन पाणीटंचाईग्रस्त गाव-पाड्यांना कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही करुन तालुक्यात पाण्याच्या अपुर्ण स्थितीत असलेल्या योजनांना विलंब करणाऱ्या दोषी अधिकारी व ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

१० योजनांपैकी सन २००४-०५ मधील केव, साखरे व देहर्जे या तीन नळ पाणीपुरवठा योजना न्यायप्रविष्ठ आहेत. सन २००५-०६ मधील दादडे, जांभा पोचाडे व हातणे या तीन नळ पाणीपुरवठा योजनांची कामे बंद आहेत. सन २०११-१२ मधील उपराळे काकडपाडा, टेटवाली बागपाडा, औंदेखांड, उटवली पोटखळ या चार योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) सदर योजनांची कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने गटविकास अधिकारी (प्रभारी) यांच्यासमोर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांच्या कामांची सुनावणी दिनांक १९/०७/२०१७ रोजी घेण्यात आली. परंतु, संबंधित समित्या त्यांच्याशी संबंधित योजनांचे काम करण्याबाबत उदासिन असल्याचे दिसून येत आहे. दिनांक ०९/०३/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार जुन्या व रखडलेल्या योजनांची कामे जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.

केव, साखरे व देहर्जे या नळ पाणीपुरवठा योजना न्यायप्रविष्ठ आहेत. सदर योजनांच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणी श्री.मुरलीधर पाटील, श्री.अशोक पाटील व श्री.माहदू गावीत यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून अपहाराची रक्कम वसुल करण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत तहसिलदार, विक्रमगड यांना कळविले आहे व योजना पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बिगर आदिवासी भागातील वर्ग तुकड्यांना अनुदान देवून मुल्यांकन करण्याबाबत

**(६) * ४१७०० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित शाळांना जोडून वाढीव विद्यार्थी संख्येवर दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन आदेशाने बिगर आदिवासी क्षेत्रातील ५७१८ व आदिवासी क्षेत्रातील २५५ अशा एकूण ५९७३ जादा वर्ग व तुकड्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विनाअनुदानित शाळा, वर्ग व तुकड्या यांना अनुदान देणेबाबत शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या शासन आदेशाने कार्यवाही करण्याचे धोरण शासनाने योजले असून वर्ग व तुकड्या यांना विनाअनुदानित तत्त्वावर मंजुरी मिळाल्यानंतर पाचव्या वर्षी या वर्ग व तुकड्या यांचे मुल्यांकन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वर्ग तुकड्यांना मंजुरी मिळून पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी गेल्याने शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सदर वर्ग तुकड्यांना अनुदान मिळण्यासाठी या वर्ग व तुकड्यांचे मुल्यांकन करण्याबाबत मागणी केली जाते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्ग व तुकड्यांना अनुदान देण्यासाठी या वर्ग तुकड्यांचे मुल्यांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक ३० मे, २०१८ अन्वये, शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील अ.क्र. ११ मध्ये सुधारणा करण्यात आली असून शाळांचे मुल्यांकन करणे, हा शासनाचा “स्वेच्छाधिकार” असल्याचे स्पष्ट केले आहे.

(३) होय.

(४) याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उच्च माध्यमिक शाळांच्या वर्ग व तुकड्या अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्याबाबत

**(७) * ४२३०८ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या यांचा कायम शब्द काढल्यानंतर अनेकदा मुल्यांकन होऊन देखील या शाळा, वर्ग व तुकड्यांची अनुदानास पात्र यादी घोषित केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उच्च माध्यमिक शाळांना सन २०१४-१५ पासून अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्याचे शासनाने आदेश दिले असून या उच्च माध्यमिक शाळांच्या वर्ग व तुकड्यांची क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून शिक्षण संचालनालय व आयुक्त शिक्षण यांच्याकडे या शाळा वर्ग व तुकड्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उच्च माध्यमिक शाळांचे वर्ग व तुकड्या अनुदानास पात्र म्हणून घोषित करून १५ वर्षापासून विनावेतन काम करणाऱ्या प्राध्यापकांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) नाही. शासन निर्णय, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये, "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळांचा "कायम" हा शब्द वगळण्यात आला आहे.

शासन निर्णय, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या १२३ उच्च माध्यमिक शाळा व २३ उच्च माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त शाखा व तुकड्यांना विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे.

उर्वरीत उच्च माध्यमिक शाळा, अतिरिक्त शाखा व तुकड्यांची क्षेत्रियस्तरावर तपासणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील नियम ४(३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात औषध विक्रेत्यांच्या परवान्याचे नुतनीकरण न करता औषध विक्रीला परवानगी दिल्याबाबत

**(८) * ४१७२० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांच्या आरोग्याच्यादृष्टीने औषध विक्रेत्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण आवश्यक असताना अन्न व औषध प्रशासन विभागाकडून ते मागील दोन वर्षापासून करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून औषध विक्रेत्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले नसल्याने रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित गोळया, इंजेक्शन, सिरप यांची तपासणी न करता त्यांच्या विक्रीला परवानगी दिल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषध विक्रेत्यांच्या परवान्याचे नुतनीकरण करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# औरंगाबाद शहरात स्कुल ऑफ प्लॅनिंग अॅण्ड आर्किटेक्चर सुरु करण्याबाबत

**(९) * ४१७६९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५६१ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात स्कुल ऑफ प्लॅनिंग अॅण्ड आर्किटेक्चर सुरू करावी याबाबत केंद्र शासनाकडून मान्यता मिळण्याकरीता मा.मंत्री (मानव संसाधन), भारत सरकार यांना मा.मुख्यमंत्री यांच्यास्तरावर दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विनंतीच्या अनुषंगाने, राष्ट्रीयस्तरावर स्कूल ऑफ प्लॅनिंग अॅण्ड आर्किटेक्चर स्थापनेबाबत अहवाल सादर करण्याबाबत व सदरचा अहवाल मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांना प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे अवगत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनास दिनांक १० ऑगस्ट, २०१७ व दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आले असून अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून सदर संस्थेच्या स्थापनेस मान्यता मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनास स्मरण करण्यात यावे यासाठी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचेस्तरावर दिनांक ०८ सप्टेंबर, २०१५ आणि अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचेस्तरावर, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ व दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आलेले आहे.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने विशेष सचिव (तंत्र शिक्षण), मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये, "मा.वित्त मंत्री, भारत सरकार यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये देशात २० (२ New full-fledged SPA's and १८ new SPA's as part of well established IITs/NITs/CU's) नवीन स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर सुरू करण्याबाबत घोषणा केली असल्याचे व त्यानुषंगाने केंद्र शासनस्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे शासनास अवगत केलेले आहे."

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुस्लिम समाजास नोकरीमध्ये व शैक्षणिक आरक्षण देण्याबाबत

**(१०) * ४१४७२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३७९७३ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यादेशाव्दारे राज्यातील मुस्लिम समाजाला नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशाव्दारे मुस्लिम समाजासाठी खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली असून मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयास कोणते पुरावे सादर करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लिम समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या समाजाला किती कालावधीत आरक्षण देण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक २३/१२/२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९/०७/२०१४ ते दिनांक १४/११/२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालानंतर याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करण्याबाबत

**(११) * ४२१०३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाच्या अहवालानुसार नदी किनाऱ्याची सर्वाधिक प्रदूषित शहरे जाहीर झाली असून त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील कल्याण शहराचा समावेश आहे तसेच देशात प्रदूषित नद्यांच्या तीरावर वसलेल्या शहरांची संख्या ६५० असून त्यातील १६१ शहरे महाराष्ट्रात तर एकूण २७५ नद्यांच्या सर्वाधिक प्रदूषित ३०२ विभागाच्या यादीतील ४९ विभाग देखील महाराष्ट्रातील आहेत, असे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये केंद्रिय जल आयोगाने प्रसिध्द केलेल्या अहवालात देशातील ४२ प्रदूषित नद्यांची यादी जाहीर केली त्यामध्ये महाराष्ट्रातील २८ नद्या असून उल्हासनदीचा समावेश होता तसेच योग्य प्रक्रिया न करता सोडले जाणारे औद्योगिक कारखान्यांचे पाणी, सांडपाणी यामुळे महाराष्ट्रातील बाणगंगा, गोदावरी, भीमा, कृष्णा, उल्हास, कुंडलिका, तापी, गिरणा, पंचगंगा, वर्धा, नीरा, रंगावली, इंद्रायणी, मिठी, वशिष्ठी, अंबा, अमरावती, बिंदुसरा, धारणा, हिवरा, मोर, मोरगा, मुठा, मुळा, पवना, पूर्णा, पैनगंगासह ४९ नद्यांचे पाणी प्रदूषित झाल्याने ४५ टक्के जल प्रवाहांमध्ये जलचरांचा श्वास कोंडत असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे केंद्रिय जल आयोगाने (सीडब्ल्यूसी) माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालामध्ये नमूद केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील ग्रामीण भागातील जनता बहुतांश भूजल स्त्रोतावर अवलंबून असून नदीतील पाणी वेगवेगळ्या कारणांमुळे प्रदूषित होत असल्याने औद्योगिकरण, कारखानदारी, मैलापाणी व चुकीच्या पध्दतीने सांडपाणी व्यवस्थापन हे प्रामुख्याने पाणी प्रदूषणास कारणीभूत ठरत असून नदीक्षेत्र नियमनाचे नवे धोरण आणण्यात दिरंगाई होत असल्याने नद्यांच्या संरक्षणासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनाला विचारणा केल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणार या संबंधिची यादी सादर करण्याबाबतचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिले असून नद्यांचे सरंक्षण करणे आणि नद्यांच्या पाण्याचा दर्जा सुधारणे हे शासनाचे रचनात्मक कर्तव्य असून नद्यांच्या संरक्षण संदर्भात सन २०११ मध्ये राज्य शासनाने केलेल्या सुधारणेनुसार नदीकाठी व्यावसायिक कारणांसाठी बांधकाम करण्याची सवलत दिल्यामुळे नद्यांचे पाणी दुषित झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे जिल्ह्यातील सुमारे ४८ लाख लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा या बारमाही वाहणाऱ्या उल्हासनदीच्या माध्यमातून होत असून या नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रदूषणामुळे राज्यातील नदीकिनारी वसलेल्या शहरातील जनतेच्या आरोग्यावर होणारा परिणाम विचारात घेता राज्यातील नद्यांचे पाणी प्रदूषित होणार नाही तसेच नदीतील गाळ, कचरा काढून राज्यातील नदयांमधील व जलप्रवाहांमधील प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यासंदर्भात आढावा घेण्यात येऊन काय उपाययोजना करण्यात आल्या,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात २०१८ मध्ये संकलित केलेल्या माहितीवरून नदीच्या पाण्याची गुणवत्ता लक्षात घेता ४९ पैकी १४ नदयांचे पट्टे कमी प्रदूषित आढळून आले आहेत. (अंबा, भातसा, धरणा, कृष्णा, मुठा, पंचगंगा, पांझरा, पेल्हार, रंगवली, सावित्री, सूर्या, उल्हास, वैतरणा, वशिष्ठी व एक कोरडी अमरावती) तसेच प्राथम्यक्रम १ मध्ये फक्त एकच नदी पट्टा आहे. प्राथम्यता २ मध्ये एकही पट्टा सद्य:स्थितीत आढळून येत नाही. प्राथम्यता ३ मध्ये पूर्वी १८ प्रदूषित पट्टे होते त्यांची संख्या आता ३ वर आली आहे. प्राथम्यता ४ मध्ये पूर्वी १२ पट्टे प्रदूषित आहेत. प्राथम्यता ५ मध्ये प्रदूषित पट्टयांची संख्या १० वरून १८ वर गेली आहे. यावरून असे आढळून येते की, प्राथम्यता १, २, ३, ४ मध्ये असलेल्या प्रदूषित पट्टयांचे प्रदूषण कमी होऊन ते प्राथम्यता ५ मध्ये आलेले आहेत.

(३) वनशक्ती पब्लिक ट्रस्ट यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठासमोर दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १४/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २४/०४/२०१८ रोजीच्या आदेशामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

(४) कारखान्यांना नदीमध्ये प्रक्रियायुक्त सांडपाणी सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली खर्चातून २५ टक्के रक्कम राखीव ठेवून याच कारणासाठी वापरणे बंधनकारक केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या सांडपाणी यंत्रणा बांधून अद्ययावत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नोटीसा दिलेल्या आहेत.

(५) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमधील खेमाणी नाल्याचे पाणी पुर्वी उल्हासनदीला जात होते आता ते पाणी अडविण्यात आलेले असून सद्य:स्थितीमध्ये ते नदीपात्रात जात नाही.

बदलापुर-कुळगाव नगरपरिषदेच्या हद्दीमधील घरगुती वापराचे सांडपाणी उल्हासनदीच्या पात्रामध्ये मिसळले जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील शाळांमध्ये फायर ऑडिट करण्याबाबत

**(१२) * ४१३५२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील सुमारे ८० टक्के शाळांनी फायर ऑडिट केले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून घोडबंदर भागातील युनिव्हर्सल स्कूलच्या बेसमेंटमध्ये माहे एप्रिल, २०१८ मध्ये लागलेल्या आगीमुळे मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरामध्ये ८१८ शाळा असून त्यापैकी महापालिकेच्या शाळांची संख्या १२१ आहे, या शाळांमध्ये सुमारे ३४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून अनेक शाळांनी अग्निसुरक्षेची व्यवस्था केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांमध्ये फायर ऑडिट करण्याबाबत कार्यवाही करुन उक्त दोषी शाळांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

महापालिकेच्या सर्व शाळांत अग्निसुरक्षेची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय फायर कंट्रोल अलार्म व इतर अनुषंगिक सुविधा पुरविण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विदयापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण येथील उपकेंद्रे कार्यान्वित करण्याबाबत

**(१३) * ४१६७६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९४६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विदयापीठाला संलग्न ८०० महाविदयालये, वाढत्या विदयार्थांची संख्या, निकाल व परिक्षा वेळापत्रकाच्या अनागोंदी कारभारामुळे विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून मुंबई विदयापीठावरील कामाचा ताण पाहता मुंबई विदयापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे सक्षमीकरण करुन उपकेंद्रे सुरु करण्याची आवश्यकता असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई विद्यापीठाच्या कल्याण येथील उपकेंद्राच्या कामाचा शुभारंभ ७ वर्षापूर्वी होवूनही अद्यापी उपकेंद्र सुरु झाले नसल्याने उपकेंद्र सुरु करण्यासंदर्भात मागील वर्षी (सन २०१७) मध्ये स्टुडंस ॲक्शन फ्रंट या विदयार्थी संघटनेने धरणे आंदोलन केले होते तसेच सदर उपकेंद्राचे माहे जून, २०१८ मध्ये शासनाने उद्घाटन न केल्यास विद्यापीठ उपकेंद्रासाठी दिलेली जमीन महानगरपालिका ताब्यात घेईल, अशा आशयाचे पत्र मा.महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु यांना पाठविले असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील रत्नागिरी, ठाणे व कल्याण येथे उपकेंद्रे कार्यान्वित केल्याशिवाय विदयार्थ्यांची गैरसोय आणि मध्यवर्ती कार्यालयावरील ताण कमी होणार नसून सदर कल्याण उपकेंद्राच्या भूमिपुजना प्रसंगी उपकेंद्रात दूरस्थ आणि मुक्त शिक्षण विभाग सुरु करण्याचे आश्वासन तत्कालिन प्रभारी कुलसचिव (डॉ.दिनेश कांबळे) यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कल्याण येथील उपकेंद्र सुरु करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे अद्याप विद्यापीठ प्रशासनाने सादर केले नसल्याचेही माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई विदयापाठीच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण येथील उपकेंद्रे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाचे रत्नागिरी आणि ठाणे उपकेंद्र सुरु झाले असून कल्याण उपकेंद्र लवकरच सुरु करण्यात येईल.

(२) हे खरे आहे. स्टुडंट्स ॲक्शन फ्रंट या विदयार्थी संघटनेने धरणे आंदोलन केले होते. तसेच महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंना कल्याण उपकेंद्र लवकरच सुरु करण्याबाबत पत्राद्वारे कळविले होते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक २९ जून, २०१८ रोजी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व त्याबाबतची फी भरणेबाबत मुंबई विद्यापीठाला कळविले आहे. त्यानुषंगाने लवकरच सदर फी भरुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

**(१४) * ४१३१४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३९१८५ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालकाकडून मान्यता देण्यात येऊन त्यांचे वेतन, वेतन पथकामार्फत काढण्यात येत असून त्यास नियमबाह्य मान्यता दिल्याचे निदर्शनास आल्यानंतर यावर उपाय म्हणून सदरहू मान्यतेचे प्रस्ताव शिक्षण संचालकांकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले व त्यानंतर कर्मचाऱ्यांचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करून वेतन काढण्यात येत होते या प्रक्रियेस विलंब लागत असल्याने शासनाने उपाय म्हणून मान्यता प्रस्ताव तपासण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृतीदलाने विभागस्तरावर समित्या स्थापन कराव्या अशी मागणी केल्याने सदरहू प्रस्ताव शिक्षण सचिवांनी नामंजूर केला तसेच हे विशेष कृती दल स्थापन करण्यास कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेने त्यास विरोध करुन पेपर तपासणीवर बहिष्कार टाकला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शिक्षकांचे वेतन एक तारखेला व्हावे यासाठी राज्य शासनाने “शालार्थ” प्रणाली लावण्याचा निर्णय घेतला मात्र शालार्थ प्रणाली लावण्यास तांत्रिक बाबींसंदर्भात संभ्राम्यवस्था असल्याने त्याचा परिणाम जवळपास १ हजार २०३ शिक्षकांना बसला असून त्यांचे वेतन दिड वर्षापासून थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, तसेच राज्यातील मान्यता प्राप्त अनेक शिक्षक शालार्थ प्रणालीत समावेश न झाल्यामुळे वेतनापासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच, नवीन सेवेत समाविष्ट झालेल्या शिक्षकांना शालार्थ प्रणालीमध्ये सामाविष्ट करून घेण्यासाठीचे प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षण संचालक कार्यालय या स्तरावर प्रलंबित असून शिक्षकांना नवीन शालार्थ आयडी मिळालेला नसल्याने आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत असल्यामुळे शिक्षकांनी संबंधित कार्यालयाकडे विनंती अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यापूर्वी राबविण्यात येणारी सरळ प्रक्रिया रद्द करून विशेष कृती दल स्थापन करुन मान्यता प्रस्ताव तपासून वेतन काढण्याबाबत कृती दलास संपूर्ण अधिकार देण्यात येणार आहे काय, तसेच शालार्थ प्रणालीमध्ये सर्व पात्र शिक्षकांचा समावेश करुन त्यांना त्वरीत वेतन सुरु करण्याबाबत व प्रलंबित असलेल्या शिक्षकांना शालार्थ आयडी देण्याबाबत कार्यवाही करुन या शिक्षकांच्या वेतनास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या शिक्षकांचे थकित वेतन कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

प्रलंबित प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी दिनांक २८/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाची संख्या विचारात घेऊन दिनांक २२/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये अन्य शिक्षण संचालकांकडे प्रस्ताव विभागून देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहावीच्या नव्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकात चुका असल्याबाबत

**(१५) * ४१९७२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्री.मोहनराव कदम, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या शैक्षणिक वर्षात दहावीची पुस्तके यंदा बदलली असून विज्ञान-तंत्रज्ञान भाग २ पुस्तकात प्रजनन संस्थेची चुकीची माहिती तसेच पृष्ठ क्रमांक ७२-डोलिओलम, ॲम्फिऑक्सस या सागर निवासी प्राण्यांची प्रतिकृती, पृष्ठ क्रमांक १८-गुणसुत्रे, पृष्ठ क्रमांक १३-मानवी श्वसनसंस्था, पृष्ठ क्रमांक ६८-आंघोळीचा स्पंज, पृष्ठ क्रमांक २३-द्विविभाजन अशा विविध चुका यांसह ४० आकृत्या चुकीच्या असल्याचे तसेच इंग्रजी माध्यमाच्या विज्ञानाच्या पाठयपुस्तकात चुकीचे स्पेलिंग, भाषांतर, मजकुरात चुका असल्याचे शिक्षणतज्ञ यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच भूगोलाच्या पाठ्यपुस्तकात राष्ट्रीय सिमा आणि राष्ट्रध्वजाबाबत अनेक चुका राहून गेल्या असून सदर पुस्तकातील प्रकरण २ मध्ये नवव्या पृष्ठावर देशाचा राष्ट्रध्वज तिरंगा दाखविला असून त्यातील अशोक चक्राचा रंग ध्वज संहितेप्रमाणे न छापणे तर तिसऱ्या प्रकरणातील पृष्ठ क्र. २४ वर भारतीय भुमिच्या आराखड्यात जम्मू-काश्मीरच्या नियंत्रण रेषेच्या उत्तरेकडील मोठा भाग स्पष्ट न होणे अशा चुका आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी पाठयपुस्तकात असंख्य चुका असून या चुका मराठी विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक बाबुराव देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व पुण्याच्या अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या चुका व निर्मितीचे बी.आर.देशमुख यांच्या निदर्शनास आणून देत आक्षेपांमध्ये

सुधारणा करण्याची मागणी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, तसेच यापूर्वी सन २००८ मध्ये चुका आढळून आल्या असताना शिक्षणमंडळाने याची पुनरावृत्ती होणार नाही, याची हमी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शालेय शिक्षण विभागाने पाठयपुस्तकांतील चुकांच्या दुरुस्तीत बदल करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शिक्षणमंडळाच्या अनागोंदी कारभाराबाबत

**(१६) * ४२१९० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शिक्षणमंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परिक्षेचे सहा पेपर व्हॉट्सअॅपवर व्हायरल झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोशल मिडीयाच्या तसेच व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून होत असलेल्या पेपरफूटी रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) इ.१० वी व इ.१२ वी च्या मार्च, २०१८ मध्ये झालेल्या परिक्षेवेळी काही विषयांच्या प्रश्नपत्रिका व्हॉटसअ‍ॅपवर प्रसारित झाल्याच्या घटना घडलेल्या होत्या. सदर प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये घटनानिहाय गुन्हे दाखल झालेले आहेत.

प्रश्नपत्रिका व्हॉटसअ‍ॅपवर प्रसारित होऊ नयेत, यासाठी उपाययोजना करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनूसार मार्च, २०१८ च्या परिक्षेपासून परिक्षा पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील उर्दू माध्यमांच्या शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(१७) * ४१४२१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८५३ ला दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील उर्दू माध्यमांच्या जिल्हा परिषद शाळेतील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची रिक्त पदे माहे मे अखेरपर्यंत नवीन प्रक्रियेद्वारे भरण्यात येतील तसेच बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमांच्या जिल्हा परिषदेतील मुलींच्या आठवी इयत्तेपर्यंतच्या शाळा दहावीपर्यंत करण्याबाबतही आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी विधान परिषद सभागृहात दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यमांच्या माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि प्राथमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पवित्र या संगणकीकरण प्रणालीद्वारे शासनाने सुरु केली आहे, तसेच मुलींच्या शाळांना नैसर्गिक वाढीनुसार नवीन वर्ग मान्यता देण्याची कार्यवाही शासन कधी पूर्ण करणार आहे व त्यात कोणकोणत्या शाळांना नैसर्गिक वाढीने नवीन वर्ग मान्यता मिळणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक कन्या (उर्दू) शाळेतील वेगवेगळ्या युडायसवर नोंद केलेल्या विद्यार्थ्यांची नोंद एकाच युडायसमध्ये करण्यासाठी सरलप्रणालीमध्ये योग्य बदल करून कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत तसेच मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या आश्वासनानूसार शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) मुलींच्या शाळांना नैसर्गिक वाढीनुसार नविन वर्ग मान्यता मिळण्याचे प्रस्ताव जिल्हा परिषद बीड अंतर्गत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत तपासून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) शिक्षकांची रिक्त पदे पवित्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांची एकाच युडायसमध्ये नोंद करण्यासाठी सरल प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात आलेले असून कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाकडून केंद्र शासनाच्या प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेच्या धर्तीवर विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(१८) * ४१८७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक समाजातील विदयार्थ्यांचे शाळा गळतीचे प्रमाण कायम असुन ते रोखण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाच्या प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेच्या धर्तीवर १ ली ते १० वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबतचा प्रस्ताव शासन तयार करीत असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने निश्चित केलेले विदयार्थी वगळता ५ लाख ५९ हजार ७७३ विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाल्याने राज्य शासनाच्या प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाकडून इयत्ता १ ली ते १० वी मधील अल्पंसख्यांक समुदायातील २,८९,७०६ नवीन विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती देण्यात येते. नुतनीकरणास मर्यादा नाही. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या परंतु मर्यादीत कोट्यामुळे शिष्यवृत्तीचा लाभ न होणाऱ्या अल्पंसख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाच्या प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीच्या धर्तीवर इयत्ता १ ली ते १० वी मधील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणाबाबत

**(१९) * ४२३०३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.जगन्नाथ शिंदे, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळाबाहय मुलांची संख्या मागील वर्षापेक्षा यंदा कमी असली तरी राज्यात अजूनही ३२ हजार ११ मुले शाळेपासून दुर असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागाच्या अहवालातून माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच राज्यात शिक्षण हक्क कायदा सात वर्षापूर्वी लागू होऊनही अद्याप ४ लाख मुले आजमितीस शाळाबाह्य असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने माहे डिसेंबर, २०१७ च्या अखेर शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणाची माहिती सादर करण्याचे आणि त्यानंतर दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणाचे आदेश शासनाला दिले असून राज्यातील शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणाचे काम सुमारे दोन वर्षापूर्वीपासून सुरु करण्यात आलेले असून अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार असतानाही प्रत्येक वर्षी हजारो शाळाबाहय मुलांची संख्या वाढत असून यास शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार असल्याने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यात राज्य शासनाला मोठे अपयश आले असल्याचे यावरुन स्पष्ट होत आहे तसेच राज्यात प्राथमिक शिक्षणाची दुरवस्था झालेली असून सुमारे ४०० शाळा एक शिक्षकी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे जुलै, २०१४ आणि माहे जानेवारी, २०१५ मध्ये शाळाबाहय मुलांचे सार्वजनिक सर्वेक्षण करण्यात आल्यानंतर शाळाबाहय मुलांचा व्यापक प्रमाणात शोध करण्यात आला नसून या सर्वेक्षणात त्यावेळी ७४ हजार शाळाबाहय मुले आढळली परंतू हे सर्वेक्षणही अपुरे झाल्याचे तज्ञांनी सांगितले असून शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करताना ऊसतोड कामगार, खाणीवर काम करणारे मजूरांची मुले, स्थलांतरी मुले, परप्रांतातून पळून आलेली मुले यांचा शोध घेण्यासाठी शिक्षण विभागाकडे यंत्रणाच नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राथमिक शाळेतील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी राज्यातील शाळाबाहय मुलांचा व्यापक शोध घेऊन मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यवाही करुन

शाळाबाहय मुलांची खोटी माहिती जाहिर करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे स्वरुप काय आहे वा शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे व यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे सर्वेक्षणास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) माहे जुलै, २०१४ आणि माहे जानेवारी, २०१५ मध्ये शाळाबाह्य मुलांचे सार्वजनिक सर्वेक्षणानंतर ७४९७१ शाळाबाहय मुले आढळली. तथापि, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करतांना ऊसतोड कामगार, खाणीवर काम करणाऱ्या मजूरांची मुले, स्थलांतरित मुले, परप्रांतातून पळून आलेली मुले यांचा शोध घेण्यासाठी शिक्षण विभागाकडे यंत्रणा नाही हे खरे नाही.

(५) मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १५/११/२०१७ रोजी जनहित याचिका क्र. ३३/२०१० मध्ये खालीलप्रमाणे आदेश दिले :-

(अ) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २०११ मधील नियम-६ खाली “समन्वय अधिकारी” नियुक्त करणेबाबत.

(ब) या अधिकाऱ्याकडून शाळाबाहय बालकांचा डेटा गोळा करुन त्याचे संकलन व छाननी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत करणेबाबत.

वरीलप्रमाणे शासनाकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

शाळाबाहय विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत असली तरी सर्वेक्षणात सर्व विद्यार्थ्यांची (२.५ कोटी) माहिती गोळा करणे हे जिकीरीचे व क्लिष्ट काम आहे. हे विचारात घेऊन सर्वेक्षणाऐवजी शाळाबाहय विद्यार्थी शोध (Search) मोहिम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेतला जातो. या संदर्भात विद्या प्राधिकरण समता कक्षमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना इंग्रजीचे विशेष शिक्षण देण्याबाबतच्या सामंजस्य कराराबाबत

**(२०) * ४१६५७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५० लाख विद्यार्थ्यांना इंग्रजीचे विशेष शिक्षण देण्यासाठी ब्रिटीश कॉन्सिलने पुढाकार घेतला असून या उपक्रमांतर्गत शिक्षकांनाही इंग्रजीचे शिक्षण दिले जाणार असून यासंबंधी कॉन्सिलचे संचालक ॲलन गेम्मेल आणि राज्याचे तत्कालिन मुख्य सचिव सुमित मलिक यांच्यात मुंबईतील सहयाद्री अतिथीगृह येथे दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सामंजस्य कराराचे व विशेष शिक्षणाचे स्वरुप काय आहे, यासाठी काही निधी खर्च करावा लागणार आहे वा किती निधी खर्च करणे अपेक्षित आहे तसेच सदरहू निधी कशाप्रकारे उभारण्यात येणार आहे, उक्त करारानुसार पुढील कार्यवाही केव्हापासून करण्यात येणार आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) सदर सामंजस्य करारानुसार राज्यातील ४५ हजार प्राथमिक शिक्षकांच्या इंग्रजी भाषेतील सातत्यपूर्ण व्यावसायीक विकासासाठी प्रशिक्षण देणार असून त्यामध्ये कृती योजनेच्या अंमलबजावणीबाबत चर्चा, भाषिक विकास, वाचनातून अध्ययन, ध्वनी चित्र फिती पाहून अध्ययन व चिंतन व कृती योजना आखणी, असे स्वरुप आहे. सदर कार्यक्रमासाठी ३ वर्षात एकूण रुपये

१५००.८ लक्ष इतका निधी अपेक्षित असून टाटा ट्रस्ट व शासन यांच्यामार्फत उभारण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी जून, २०१८ पासून सुरु झालेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील प्रलंबित पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२१) * ४१३६४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत ग्रामीण भागातील पाणीटंचाईची समस्या सोडवण्यासाठी शासनाद्‌वारे हाती घेण्यात आलेल्या विविध योजनांमधून ठाणे जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाद्‌वारे नळ पाणीपुरवठा योजना आणि विहीर योजना हाती घेण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाचा तालुका अशी ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्याची ओळख असूनही हा तालुका भीषण टंचाईग्रस्त गणना केल्यामुळे शहापूर तालुक्याच्या पाणी टंचाई निवारणासाठी सन २०१४ पासून मागील ५ वर्षात टँकरने पाणी पुरवठ्यासाठी सुमारे ३ कोटी ४९ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आल्याचे जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागास प्राप्त झालेल्या अहवालातून निदर्शनास आले असून शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा केलेल्या टँकर ठेकेदारांचे सुमारे ५५ लाख रुपये मागील वर्षापासून ठाणे जिल्हा परिषदेकडे थकित असल्यामुळे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी तात्पुरत्या पाणी पुरवठ्यावर खर्च करण्यात आला असून सदरहू योजना व्यवस्थितपणे राबविण्यासाठी शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ या चार तालुक्यातील ग्रामपंचायतस्तरावर ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समित्यांची स्थापना करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारच्या सर्वसमावेशक समितीची स्थापना केल्यानंतरही जिल्ह्यात सुमारे ७४ पाणीपुरवठा योजना प्रलंबित आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू गावासाठी कायमस्वरुपी नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

शहापूर तालुका डोंगराळ व अतिदुर्गम असल्याने व उन्हाळ्यामध्ये भूगर्भातील पाणी पातळी खालावत असल्याने माहे मार्च अखेर काही भागामध्ये टंचाईसदृष्य स्थिती निर्माण होते.

शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई निवारणार्थ सन २०१४ पासून मागील ५ वर्षात टँकरने पाणी पुरवठ्यासाठी रुपये २.०६ कोटी एवढा निधी खर्च झालेला आहे. शहापूर तालुक्याकरीता सन २०१६-१७ मध्ये टँकरवर झालेला खर्च भागविण्यासाठी रुपये ५५.०० लक्ष इतक्या निधीची मागणी जिल्हा परिषद, ठाणेमार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दिनांक २०/०३/२०१८ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. सदर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संबंधित टँकर ठेकेदाराने देयक न मिळाल्यास दिनांक २०/०५/२०१८ पासून टँकर बंद करणार असल्याचे गटविकास अधिकारी यांना दिनांक १४/०५/२०१८ च्या पत्रान्वये कळविले होते. तथापि, निधीची मागणी करण्यात आली असून निधी प्राप्त होताच अदा करण्याचे आश्वासन दिल्याने टँकर बंद करण्यात आले नाहीत.

टँकरने पाणीपुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेला निधी तात्पुरत्या पाणी पुरवठ्यावर खर्च केला हे खरे नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील पाचही तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) ठाणे जिल्हयामधील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २००५-०६ पासून ते २०१५-१६ पर्यंत मंजूर झालेल्या अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड व शहापूर या तालुक्यांतील प्रलंबित असलेल्या योजनांची संख्या माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंत ७४ होती. सदर योजना ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या उदासिनतेमुळे व अंतर्गत वादामुळे रखडलेल्या आहेत.

सदर योजनांबाबत जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर वेळोवेळी सुनावणी घेऊन योजना पूर्ण करण्याबाबत संबंधित ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समित्यांना निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे १० योजनांची कामे पूर्ण होऊन सद्य:स्थितीत ६४ योजना प्रलंबित आहेत.

तसेच दिनांक ९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रखडलेल्या योजना जिल्हा परिषद स्तरावर ताब्यात घेऊन त्या योजनांचे मुल्यांकन करुन अंतिम टप्प्यात असलेल्या योजना आहे त्यास्थितीत पूर्ण करण्याच्या व कामे पूर्ण होणे शक्य नसलेल्या योजनांबाबत जिल्हा परिषदेमार्फत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना तालुकास्तरावर देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील इंद्रायणी नदी प्रदूषित झाल्याबाबत

**(२२) * ४२४४७ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील आंबी-वराळे रस्त्यावरील पुलाशेजारी इंद्रायणी नदीकाठी जैववैद्यकीय कचरा टाकला जात असल्याने इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंद्रायणी नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या गावांतील रहिवाशी आणि पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, रोगराईची भीती व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत कार्यवाही करुन नदीपात्रात जैववैद्यकीय कचरा टाकणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे,

अज्ञात व्यक्तीने संभवता औषध विक्री दुकानातील मुदत संपलेला सुमारे १४.३ किलो ग्रॅम जैववैद्यकीय कचरा अंबी, वराळे रस्त्यावरील पुलाशेजारी नदीकाठी दिनांक २३/०४/२०१८ रोजी टाकल्याचे दिसून आले होते.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे व पशुसंवर्धन विकास अधिकारी, पुणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार इंद्रायणी नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेले गावातील रहिवाशी आणि पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असुन रोगराईची कोणतीही भिती व्यक्त झालेली नाही.
(३) नदीपात्रात टाकलेल्या जैव वैद्यकीय कचरा संकलित करुन त्याची विल्हेवाट सामूहिक जैववैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्रात करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे यांना सदर अवैधरित्या जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट होत असल्यास तपास करुन संबंधितांवर कारवाई करणेबाबत दिनांक १९/०६/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२३) * ४२००५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालये व विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने येणारे प्रशासकीय ताण व विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी तसेच रत्नागिरीतील ४५, सिंधुदुर्गमधील ३८ अशा ८३

महाविद्यालयाकरीता कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शैक्षणिक संस्था यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात माहे जून पूर्वी लोकप्रतिनिधी यांची बैठक घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबाबत घेण्यात आलेल्या बैठकीत सदरील प्रकरणी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बैठक आयोजित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुदानित शाळेतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(२४) * ४२४१७ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १००% अनुदानित शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाल्यास शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याची तरतूद MEPS Act आणि शाळासंहितेमध्ये आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोरणानुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन इतरत्र होणे तसेच २०% अनुदानित शाळांच्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याबाबत शासनाचे धोरण अद्यापपर्यंत स्पष्ट नसल्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन २०% अनुदानावर काम करणाऱ्या व अतिरिक्त होत असलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत ऑनलाईन समायोजन प्रक्रियेद्वारे १०० टक्के अनुदानित शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना अपूर्ण ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२५) * ४२२४५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी शासनाचा करोडो रुपयांचा निधी मिळूनही पाणी योजना अपूर्ण ठेवणाऱ्या समितीच्या पदाधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करावी असे आदेश जिल्हाधिकारी, बीड यांनी जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील ७१ पाणीपुरवठा समिती पदाधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश तहसिलदारांना देऊनही अद्यापपर्यंत तहसिलदारांकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने जिल्हाधिकारी यांनीही तहसिलदारांवर कारवाई केली नाही, तसेच ७१ पाणीपुरवठा योजनेच्या समितीचे पदाधिकारी व तहसिलदार यांच्यामध्ये काही आर्थिक संगनमत आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना अपूर्ण ठेवणाऱ्या समितीच्या पदाधिकारी व तहसिलदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) नाही.

सदर प्रकरणात सर्व तहसिलदार यांना तालुकानिहाय नळ पाणीपुरवठा योजनांच्या समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचे मालमत्तेवर बोजा टाकण्यास कळविण्यात आले आहे.
(३) बीड जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालयामार्फत पाणीपुरवठा योजनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मालमत्तेवर बोजा टाकण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना राबविण्याबाबत

**(२६) * ४२३९८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण जनतेला पुरेसे आणि स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सुरु करण्यात आले परंतू या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कोणताही विशिष्ट क्षेत्र धोरण आकृतिबंद तयार केला नसल्याचे तसेच ग्रामीण जल सुरक्षा आराखडा, जिल्हा जल सुरक्षा आराखडा आणि पंचवार्षिक सर्वसमावेशक जल सुरक्षा कृती आराखडा प्रलंबित असून राज्यात कोटयवधी रुपये खर्चूनही पेयजल योजना अपयशी ठरल्याचे कॅगच्या अहवालात नमूद केल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदेद्वारा राबविण्यात येणाऱ्या ७१४१ योजना माहे मार्च, २०१७ पासून बंद असून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ८९ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर खर्च करण्यात आला तसेच प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेमध्ये असलेल्या त्रुटीही कॅगच्या अहवालात दाखविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी राज्यात वाढत्या दुष्काळावर मात करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना सक्षमपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातल्या जिल्हा परिषदांद्वारे राबविण्यात येणाऱ्या ७१४१ योजनांपैकी ३०७ योजना नळ पाणीपुरवठा योजना आहेत. उर्वरित ६८३४ या विंधन विहिरी, हातपंप इ. प्रकारच्या विविध उपाययोजना आहेत. जल सुरक्षितता आराखड्याची व्याप्ती विचारात घेता प्रत्येक गावाचा जल सुरक्षितता आराखडा एकाच टप्प्यात तयार करणे शक्य नसल्याने केंद्र शासनाने अतिशोषित भागामध्ये “जल सुरक्षितता पथदर्शी प्रकल्प” राबविण्याबाबत माहे मार्च, २०१२ मध्ये निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्यातील डोमक गाव, तालुका मोर्शी, जि.अमरावती या गावाची निवड करण्यात आली व सदर गावाचा जल सुरक्षितता आराखड्यास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. याच धर्तीवर अमरावती जिल्ह्यातील ९६ गावांचा जल सुरक्षितता आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर पथदर्शी प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यातील ३४ जिल्ह्यामध्ये प्रत्येकी १ ग्रामपंचायतीची निवड करून ३४ ग्रामपंचायतींमध्ये जल सुरक्षितता आराखडा तयार करण्यात आला आहे.

राज्यातील एकूण ९९७३२ गावे/वाड्यापैकी ८७५२३ गावे/वाड्यांना शासन निकषान्वये निर्धारित दरडोई पाण्याच्या प्रमाणात पेयजल उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. उरलेल्या गावांना दरडोईच्या निकषाप्रमाणे पाणी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सक्षमपणे राबविण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरावरील अंमलबजावणी यंत्रणांना, वेळोवेळी आढावा घेऊन योजना प्राथम्याने पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. तसेच सन २०१८-१९ या वर्षाच्या कृती आराखड्यामध्ये नव्याने समावेश करावयाच्या गावांसाठी शासनाने सदरील गावांमधील अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांची माहिती संकलित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यानुसार जिल्हास्तरावर मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सदर माहिती विचारात घेऊन गावांचा कृती आराखड्यात समावेश करण्याच्यादृष्टीने शिफारस करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शासनाच्या सर्व सोयीसुविधा मिळण्याबाबत

**(२७) * ४२५९५ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात शासनाने वेळोवेळी आश्वासन देवूनही ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शासनाच्या सर्व सोयीसुविधा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) आर्थिक भाराच्या मागण्या वगळता इतर मागण्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धार्मिक अल्पसंख्यांक विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(२८) * ४१२७७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत व्हावी म्हणून दिली जाणारी शिष्यवृत्ती शाळा संपली तरी मिळाली नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन राज्यात ८ हजार ७९१ धार्मिक

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज नुतनीकरण केले परंतु, मुख्याध्यापकांनी ते अर्ज दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ च्या आत पडताळणी न केल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासुन वंचित राहिले असल्याने शासन या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणार आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणी न करणाऱ्या मुख्याध्यापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

शाळास्तरावर सक्षम प्राधिकाऱ्याचे उत्पन्न प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्यांनी वेळेत सादर केले नसल्याने असे अर्ज शाळास्तरावर प्रलंबित राहिले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहा (ता.जि.नांदेड) येथील पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांची चौकशी करण्याबाबत

**(२९) * ४२०७३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (ता.जि.नांदेड) येथील पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन कायम गटशिक्षणाधिकारी देण्याची मागणी निवेदनाद्वारे संबंधितांना करण्यात आल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहा पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यकाळात गैरकारभार होवून अनेक केंद्र प्रमुखाची नियुक्ती मनमानी पध्दतीने केली असून सदर अधिकारी कार्यालयात नियमित न येता अनेक शिक्षकांनाही नाहक त्रास देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) लोहा (ता.जि.नांदेड) येथील पंचायत समितीच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्याविरुध्दची तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदर रिक्त पद भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रसुतीकालीन रजेवर असलेल्या महिला प्राध्यापकांच्या जागेवर रजाकालीन प्राध्यापकांची नियुक्ती करण्याबाबत

**(३०) * ४२३६३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मान्यता प्राप्त कला, विज्ञान व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालयात सेवेत कार्यरत महिला प्राध्यापकांना शासनाने सहा महिने कालावधीची प्रसुती कालीन रजा मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत महिला प्राध्यापकांच्या रजा काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता रजाकालीन कालावधीसाठी अर्हताधारक प्राध्यापकांच्या नियुक्तीस शासनाने मान्यता देणे व त्यासाठी वेतन मंजूर करणे याबाबी शासनाच्या विचाराधीन आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयीन दैनंदिन शैक्षणिक कामकाजावर प्रतिकुल परिणाम व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता प्रसुतीकालीन रजेवर असलेल्या महिला

प्राध्यापकांच्या जागेवर रजाकालीन प्राध्यापकांची नियुक्ती करण्यास मान्यता व त्यासाठी शासनाकडून वेतन मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रसुती रजेवर असणाऱ्या महिला अध्यापकाच्या रजा कालावधीसाठी अर्हताधारक अध्यापकांची नियुक्ती करण्याबाबतचे धोरण नाही. त्यामुळे प्रश्नात नमूद कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील शाळांचे प्रतिपुर्तीचे शुल्क प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * ४२६६३ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१३-१४ पासून बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षण अधिकारांतर्गत (आरटीई) प्रवेशाची प्रक्रिया सोलापूर जिल्हयात सुरु झाल्यापासून शाळांचे लाखो रुपयांचे प्रतिपुर्तीचे शुल्क प्रलंबित असल्यामुळे शिक्षकांचे वेतन व इतर कामकाज, सोईसुविधांवर त्याचा परिणाम होत असल्याने सोलापूर जिल्हयातील शिक्षक संघटना आंदोलन करीत असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीई कायद्यांतर्गत प्रवेश देतेवेळी शाळांना कोणती कागदपत्रे द्यावयाची याची माहिती संबंधितांकडून दिली जात नसल्यामुळे प्रस्तावात नेहमीच त्रुटी रहात असल्याने दरवर्षी प्रतिपुर्तीची रक्कम वाढत जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या अभियांत्रिकी शाखेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३२) * ४१९१८ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या अभियांत्रिकी शाखेच्या ४० विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाच्या पत्रात उपकुलसचिवांची बनावट सही करुन निकालात फेरफार केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
उपकुलसचिवांची बनावट सही असलेले पत्र आढळून आलेले आहे. तथापि, कार्यालयीन निकालनस्तीत फेरफार आढळून आलेला नाही.
(२) सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. मात्र विद्यापीठाने प्रशासनाच्या निर्देशान्वये बांद्रा कुर्ला पोलीस ठाण्यामध्ये यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे. तसेच विद्यापीठामार्फत याबाबत चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात शाळा सुरु करण्याकरीता संस्थाचालक राजकीय व आर्थिक बळाचा दुरुपयोग करीत असल्याबाबत

**(३३) * ४२५६७ श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात नवीन शाळा सुरु करण्यापूर्वी आवेदन प्रक्रिया पुर्ण करुन शिक्षण विभागाकडून निर्धारीत नियमांच्या पूर्ततेची पाहणी झाल्यानंतर शाळा मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो व शाळांना मान्यता दिली जाते असे असूनही अनेक संस्थाचालक राजकीय व आर्थिक बळाचा दुरुपयोग करुन मान्यतेशिवाय शाळा सुरु करीत असून त्याला शिक्षण विभाग जबाबदार असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे माळेगांव बाजार येथे स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) * ४१५५२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माळेगांव बाजार येथे स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत शिवसेना उपतालुका प्रमुख, तेल्हारा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वैयक्तिक शौचालय बांधकाम नियमाप्रमाणे न करता रुपये ५ ते ६ हजार एवढ्या रकमेतच करण्यात आले असून तात्पुरते व कच्च्या स्वरुपाचे बनविण्यात आले तसेच वापरण्यात आलेले साहित्य हे अत्यंत हलक्या दर्जाचे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांच्या अज्ञानतेचा फायदा घेवून त्यांच्याकडून बँकेचे पासबुक, पैसे काढण्याची पावती, सहया, अंगठे, ठेकेदाराने स्वतःकडे घेवून प्रतिज्ञालेख सुध्दा परस्पर केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे माळेगांव येथील वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम नियमाप्रमाणे करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदस्तरावर चौकशी करण्यात आली. चौकशीत माळेगाव बाजार ग्रामपंचायती मधील शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, शौचालयाच्या प्रत्यक्ष तपासणीअंती लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये रुपये १२०००/- इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शौचालय बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले नसल्याचे तसेच गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळून आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दादर पारसी कॉलनी येथील मुंबई विद्यापीठाची जागा पुनर्विकासासाठी देण्यात आल्याबाबत

**(३५) * ४१४५३ ॲड.अनिल परब, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर पारसी कॉलनी येथील मोक्याच्या ठिकाणी असणारी मुंबई विद्यापीठाची जागा सन २००६ मध्ये खाजगी विकासक आणि सहमालकांच्या परवानगीने पुनर्विकासासाठी दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जागेत बाहेरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गेस्ट हाऊस बांधणे प्रस्तावित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा विकासकांला देताना कोणत्याही प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे यासंदर्भात चौकशी करण्याबाबतचे निवेदन युवासेना सिनेट सदस्यांनी मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

श्रीमती सौदामिनी पंतवैद्य यांनी दिनांक ०७/०५/१९७८ रोजी केलेल्या दुसऱ्या व अंतिम मुत्यूपत्राच्या पुरवणीतील (Second Codicil Will) मधील कलम क्र. ४ अन्वये मुंबई विद्यापीठांस सदर Property साठी स्कीम तयार करण्यासाठी सुचीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे. यासंदर्भात सखोल चौकशी करण्याबाबतचे निवेदन युवासेना सिनेट सदस्यांनी मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना दिले आहे.

सदर तळमजला अधिक दोन मजल्यांची इमारत सुमारे १९३१ च्या दरम्यान बांधण्यात आली होती. या इमारतीचे इतर दोन सहमालक (CO-OWNERS) १. श्री.भास्कर जोशी व २. श्रीमती सोनल चिन्मय दिवेकर यांच्या संमतीने जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्यासाठी तत्कालिन विद्यापीठ अभियंता यांचा दिनांक २३ जून, २००४ रोजीचा तांत्रिक व्यवहारीता (Technical Feasibility Report) दिनांक १५ सप्टेंबर, २००४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात आला. व्यवस्थापन परिषदेने विकासकामार्फत पुनर्विकास करण्याची परवानगी दिली.

(४) याबाबत मानद विधी सल्लागार मुंबई विद्यापीठ यांचा सल्ला घेण्यात येत असून त्यांच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही विद्यापीठस्तरावर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यासह मुंबई शहराचे प्रदुषण रोखण्याबाबत

**(३६) * ४२८६८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७०५ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह नवी मुंबई, नागपूर, चंद्रपूर, पुणे, सोलापूर शहरात प्रदूषणाचे प्रमाण वाढले असल्याने प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला असून जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या हवा प्रदुषणाच्या चाचणीमध्ये जाहिर केलेल्या जगातील सर्वाधिक १५ प्रदूषित शहरांच्या यादीत मुंबई शहर चौथ्या क्रमांकावर असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान नमूद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरांच्या प्रदूषणामुळे मुंबईतील दर दहा माणसांपैकी ८ लोक प्रदूषित हवेने श्वासोच्छश्वास करीत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरातील प्रदूषण रोखण्याकरीता कोणत्या विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, तसेच प्रदूषण करणारे घटक कोणते आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जागतिक आरोग्य संघटनेमार्फत प्रसिध्द केलेला अहवाल हा जागतिक स्तरावर हवा प्रदूषणाबाबत उपलब्ध असलेल्या आकडेवारीच्या आधारे बनविण्यात आला आहे. सदर अभ्यासामध्ये उपलब्ध आकडेवारी सांख्यिकी प्रक्रियेव्दारे पुर्नमुल्यांकन करुन व त्यांच्या मानकांशी तुलना करुन सदर निष्कर्ष काढण्यात आला आहे. सदर अहवालामध्ये समाविष्ट राज्यातील १७ प्रदूषित शहरांच्या हवेच्या गुणवत्तेमध्ये सुधार करण्याकरीता कृती आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## देवरुख (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ऐतिहासिक महिपतगडाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३७) * ४३३१५ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरुख (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या ऐतिहासिक महिपतगडाकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष होत असून कुंडी घाटाचे प्रलंबित असलेले काम आणि विकासासाठी निधी मिळत नसल्याने ऐतिहासिक शिवकालिन महिपतगडाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार ऐतिहासिक महिपतगडाच्या दुरुस्तीकरीता निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७ साली महिपतगड या किल्ल्यास राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. कुंडी घाटाचे काम हे या विभागाच्या अखत्यारित येत नाही.

(२) पुरातत्व विभाग, रत्नागिरी यांनी पाहणी केल्यानुसार या किल्ल्यांवरील मलब्याच्या ढिगाऱ्याखालील वास्तूंचे/वास्तुघटकांचे अवशेष दडलेले असल्याची दाट शक्यता आहे. या मलब्याची तपासणी व सफाई झाल्यानंतरच या किल्ल्याच्या सर्वांगीण जतन-दुरुस्तीची कामे ठरविणे व अंदाजपत्रक संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्याकडून तयार करण्यात येणार आहे. तद्नंतर महिपतगड या किल्ल्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयात शुध्द पाण्याचा पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३८) * ४३४७२ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शुध्द पाणीपुरवठा करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेतील तपासणीतून अपयशी ठरला असून जिल्हयातील पाण्याचे नमुने तपासले असता नागपूर जिल्हयातील १० टक्के पाणी दुषित असल्याचे तसेच राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त जिल्हयातील पाण्याच्या टाक्या, विहीर, हातपंप, टँकर आदी ठिकाणच्या पाण्याच्या स्त्रोतातील पाणी दूषित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वाधिक २७ टक्के दूषित पाणी वाशीममध्ये, २४ टक्के हिंगोलीमध्ये, तर २१ टक्के चंद्रपूरमध्ये असल्याचे निदर्शनास आले असून दूषित पाणी प्याल्याने पटकी, कावीळ, विषमज्वर, अतिसार अशा जलजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अनेक नागरिक मृत्यू पावले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर जिल्ह्यात शुध्द पाण्याचा पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे जिल्हा प्रयोगशाळा आणि उपविभागीय प्रयोगशाळा यांचेकडे जल सुरक्षकांद्वारे आणलेल्या पाणी नमुन्यांचे अणुजैविक तपासणी अहवालानुसार नागपूर जिल्ह्यातील ९.८० टक्के पाणी दूषित असल्याचे नमूद केले आहे.
(२) हे खरे नाही.

| जिल्हा<br>(१) | दूषित पाणी नमुने (टक्के)<br>(२) | प्रश्नातील नमूद रोगांमुळे बाधित रूग्ण संख्या<br>(३) | रकाना ३ पैकीच्या रूग्णापैकी मृत झालेल्यांची संख्या<br>(४) |
|---|---|---|---|
| नागपूर | १० | २४६ | ० |
| हिंगोली | २५ | ० | ० |
| वाशीम | १८.१५ | ० | ० |
| चंद्रपूर | १२.९० | ११४ | ० |

(३) पाणी नमूना तपासणी होताच अणुजैविक पृथ:करण अहवालानुसार पिण्यास अयोग्य असल्यास तात्काळ संबंधित ग्रामपंचायतीला भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून भ्रमणध्वनीद्वारे व लेखी कळविण्यात येते. त्यानुसार जिल्हा प्रशासनानुसार पाणी शुध्दीकरणाबाबतच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी, साकीनाका तसेच विलेपार्ले (मुंबई) येथे बनावट सौंदर्यप्रसाधनांची विक्री होत असल्याबाबत

**(३९) * ४३५०५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व, पश्चिम) तसेच साकीनाका (मुंबई) येथे अन्न व औषध प्रशासनाच्या मुंबई (औषध) विभागातील अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अधिकाऱ्यांनी या तीन ठिकाणी छापे टाकत लॉरीयलच्या कंटेनरमधून बनावट शाम्पू, कंडीशनर विकणाऱ्या टोळीला दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास पकडून त्यासोबत दिड कोटींहून अधिक किंमतीचा बनावट शाम्पू, कंडीशनर व मुद्देमाल जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच विलेपार्ले (मुंबई) येथे बनावट सौंदर्यप्रसाधनांचा १८ लाखांचा साठा जप्त करुन शॅम्पू, तेल अन्य सौंदर्यप्रसाधनांच्या रिकाम्या बाटल्यांचा पुनर्वापर करुन बनावट सौंदर्यप्रसाधनांची विक्री सुरु असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट सौंदर्यप्रसाधनांच्या विक्रीवर प्रतिबंध आणण्यासाठी सौंदर्यप्रसाधने सीलबंद स्वरुपात विकण्याची उत्पादकांना सूचना करण्याबाबत कार्यवाही करुन बनावट सौंदर्यप्रसाधने विकणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे. अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या छाप्यामध्ये ४ लाख ७० हजार किंमतीचा साठा जप्त केला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या छाप्यामध्ये ४ लाख ८८ हजार किंमतीचा साठा जप्त केला आहे.

(३) सदर प्रकरणी साकीनाका पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/०५/२०१८ रोजी गुन्हा क्र. ३०७/१८ प्रथम खबर अहवाल नोंदविला आहे. तसेच अंबोली पोलीस स्टेशन येथे दिनांक १४/०५/२०१८ रोजी गुन्हा क्र. २४४/१८ प्रथम खबर अहवाल नोंदविला आहे. सदर प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील खाजगी कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(४०) * ४३६०० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटे ग्रामपंचायत हद्दीतील बांधपाडा हद्दीत खाजगी कंपनीकडून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमाचे उल्लंघन करुन कंपनीतील कचरा बेकायदेशीररित्या समुद्र किनाऱ्यावर टाकून सदर कचऱ्याला आग लावण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी कंपनीतील खराब मालाचे कंटेनर या भागात रिकामे केल्याने गावातील लहान मुलांसह तेथील नागरिकांना दुर्गंधीमुळे इन्फेक्शन झाल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर खाजगी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) मे.क्वींटीनेन्टल वेअरहाऊस कॉपोरेशन (एनएस) लि. खोपटा गाव, ता.उरण या कंपनीचे खराब मालाचे कंटेनर दिनांक २७/०३/२०१८ रोजी रिकामी केल्याने कंपनी लगतच्या रहिवासी भागात दुर्गंधी पसरल्याने गावातील लहान मुलासह तेथील नागरीकांना दुर्गंधीमुळे इन्फेक्शन झाल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही असे जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड यांनी कळविलेले आहे.

(३) मे.क्वींटीनेन्टल वेअरहाऊस कॉपोरेशन (एनएस) लि. खोपटा गाव, ता.उरण या कंपनीला दिनांक २०/०६/२०१८ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत कार्यरत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(४१) * ४१६०१ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६८२ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत कार्यरत शिक्षक व इतर सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(२) तसेच, मयत झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना पेन्शन देण्याबाबत नियुक्त केलेल्या समितीने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) वित्त विभागामार्फत नियुक्त समितीपुढे प्रकरण धोरणात्मक निर्णयाकरीता विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील कार्यरत शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत

**(४२) * ४२३७० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील कार्यरत शिक्षकांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदीच्या नियमावलीतील नियम क्र. १२ व अनुसूची 'फ'- नुसार संदर्भ अ, ब, क, ड, इ, ग, ह निहाय तयार केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमातील या तरतुदीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्णय दिला असून सदर निर्णयाच्या आधारे मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेसुद्धा दिनांक ०३ एप्रिल, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयामुळे परस्पर विसंगती निर्माण झाली असून गोंधळ निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा घटनेप्रमाणे कायदा/नियम समजला जातो आणि त्यामुळे सेवाज्येष्ठतेबाबत परस्पर विरोधी कायदा/नियम अस्तित्वात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७, दिनांक ०५ एप्रिल, २०१८ आणि दिनांक ०९ मे, २०१८ रोजी निवेदन पाठवून खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासंदर्भात योग्य ती कायदेशीर तरतुद/सुधारणा करण्याची तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांमधील सेवाशर्ती विनियमन अधिनियम या संदर्भातील नियमावलीच्या अनुसूची ‘फ’ मधील तदतुदींमध्ये सुधारणा करण्याबाबत तसेच सदर सुधारणांना विधीमंडळाची सहमती प्राप्त करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनुसूची ‘फ’ मधील तदतुदींमध्ये आवश्यक त्यासुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्यास विधीमंडळाची सहमती प्राप्त करणार आहे काय, असल्यास, केव्हापर्यंत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सेवाजेष्ठतेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) होय.

(५) याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्या-मसलतीने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(४३) * ४१५८० श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थांनी विना अनुदान तत्वावर सुरु केलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळच्या वेळी दर महिन्याला वेतन दिले जात नसल्याच्या तक्रारी तंत्रशिक्षण संचालक व तंत्रशिक्षण विभागाकडे माहे एप्रिल महिन्यात प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित महाविद्यालयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

माहे एप्रिल, २०१८ मध्ये दोन संस्थांविरुध्द वेतनासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण यांच्यास्तरावर चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. संबंधित समित्यांनी सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई व सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत संचलित २ व्यावसायिक महाविद्यालयांची चौकशी करून त्याचा अहवाल सादर केला आहे.

(३) चौकशी समित्यांच्या अहवालानुसार दोषी संस्थांनी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे अनियमितता केल्याचे दिसून आले.

(अ) शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन थकविणे.

(ब) नियमानुसार भत्ते अदा न करणे.

(क) वेतनातून कपात केलेला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) संबंधितांच्या खात्यात जमा न करणे.

(ड) शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (Ratio) नियमानुसार नसणे.

(इ) सहावा वेतन आयोग लागू न करणे.

वरील वित्तीय व प्रशासकीय अनियमिततांमुळे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करीता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहीत केलेल्या वेतनविषयक निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस असल्याने सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत या संस्थेंतर्गत असलेल्या व्यावसायिक महाविद्यालयांविरुद्ध कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस कळविण्यात आले आहे. तर सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई या संस्थेविरूध्दचा चौकशी अहवाल माहे मे, २०१८ मध्ये प्राप्त झाला असल्याने सदर संस्थेविरूध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस कळविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सागरी नियमन क्षेत्राच्या (सीआरझेड) निकषात बदल करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिल्याबाबत

**(४४) * ४१८८६ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने केंद्र शासनाकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये पाठविलेल्या सागरी नियमन क्षेत्राच्या (सीआरझेड) निकषात बदल करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली असून सीआरझेड दोनची मर्यादा सागरी किनाऱ्यापासून १०० मीटर वरुन ५० मीटरपर्यंत करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात घेतल्याने सुमारे १५०० हेक्टर जमीन रिकामी होण्याचे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याचा लाभ कशाप्रकारे कोणत्या विभागात होणार आहे तसेच सदर निर्णयामुळे मोकळया होणाऱ्या सुमारे १५०० हेक्टर जमिनीचा वापर कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) अंशतः खरे आहे. राज्य शासनाच्या महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने दिनांक ०८/०१/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सागरी नियमन क्षेत्र ५० मीटर करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. तद्नुसार, केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १८/०४/२०१८ रोजी प्रारुप सागरी नियमन अधिसूचना, २०१८ प्रसिद्ध केली असून ६० दिवसांच्या आत हरकती व सूचना दाखल करण्याबाबत कळविलेले आहे. तद्नुसार, खाडी व नदी याकरीता सिआरझेडची मर्यादा खाडीची रूंदी किंवा उच्चतम भरती रेषेपासून ५० मी. पर्यंतचा परिसर यापेक्षा जे कमी असेल ते क्षेत्र नाविकास क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. जो पूर्वी सिआरझेड अधिसूचना, २०११ मध्ये उच्चतम भरती रेषेपासून १०० मी. अंतरापर्यंत किंवा खाडीची रुंदी यापैकी जे कमी असेल ते याप्रमाणे निश्चित केले होते.
(२) सदर प्रारुप अधिसूचनेनुसार, खाडीकरीता पूर्वीची १०० मी. किंवा खाडीची रुंदी याऐवजी उच्चतम भरती रेषेपासून ५० मी. किंवा खाडीची रुंदी यापेक्षा जे कमी असेल ते विचारात घेण्याबाबत तरतुद केली असल्याने खाडी परिसरामध्ये देखील बहुतांश क्षेत्र सिआरझेड मधुन वगळले जाणार आहे.

तसेच, जोपर्यंत सदर अधिसूचना अंतिम होऊन त्याप्रमाणेच सिआरझेड नकाशा अंतिम होत नाही तोपर्यंत निश्चित किती क्षेत्राकरीता लाभ होणार आहे याबाबत माहिती देता येणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत

**(४५) * ४१५७० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९६२ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना त्यांच्या ज्ञानदानाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ नये यासाठी शासनाने विविध योजना सुरु केल्या असून शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करावी, अशी मागणी शिक्षक परिषदेने शासनाकडे केली होती त्यानुसार राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना १ एप्रिलपासून सुरु करण्यात येईल अशी घोषणा मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेस जास्त वेळ लागत असून ही योजना खर्चिक असल्याने सदर योजना बंद करुन महाराष्ट्र पोलीस विभागाप्रमाणे कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना सुरु करण्यासाठी शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी माध्यमाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांना वैदयकीय

खर्चाची देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेऐवजी कॅशलेस स्मार्टकार्ड योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न होण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर योजना लागू करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत

**(४६) * ४२३४७ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांना २४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजना लागू केली जाते, परंतू सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याने काही शिक्षकेतर कर्मचारी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली, शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित सेवांतर्गत प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्यापही सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आलेली नाही. याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत.

(२) व (३) सदर निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची बाब तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळांबाबत

**(४७) * ४२७४० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाची मान्यता न घेता अनधिकृतपणे शाळा सुरु करुन विद्यार्थ्यांची बोगस पटसंख्या दाखवून शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या अनुदानाचा अपहार केल्याप्रकरणी महसूल खात्यातील अधिकाऱ्यांच्यावतीने दिनांक ३, ४ व ५ ऑक्टोबर, २०११ रोजी राबविलेल्या पटपडताळणी मोहिमेंतर्गत सुमारे २१ लाख विद्यार्थी बोगस आढळल्याने राज्यातील १४०४ प्राथमिक व २४१ माध्यमिक शाळा रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अनधिकृतपणे चालविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या शाळेच्या समस्या सोडविण्याबाबत

**(४८) * ४१८४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या शाळांना आर.टी.ई.प्रमाणे भौतिक सुविधा मिळत नसल्याचे यु-डायस अहवालातुन निदर्शनास आले असून राज्यातील ३३४८ शाळेत मुलांची तर २०१८ शाळेत मुलींची शौचालये नाहीत तर विविध कारणाने ७००० शौचालये विनावापर पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील ९४३ जिल्हा परिषदेच्या शाळेचे २० लाख रुपयांचे वीज देयक प्रलंबित असल्याने महावितरण वीज जोडणी खंडीत करीत आहे, तसेच औरंगाबाद जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३९५ शाळांच्या इमारती धोकादायक असून सदर इमारती पाडण्यास जिल्हा परिषद प्रशासन दिरंगाई करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

यु-डायस नुसार ३३४८ शाळांपैकी १९१० शाळा केवळ मुलींच्या असल्याने १४३८ शाळांत मुलांची स्वच्छतागृहे उपलब्ध नाही. २०१८ शाळांपैकी १०४८ शाळा केवळ मुलांच्या असल्याने मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसलेल्या शाळा ९३४ दिसतात. विनावापर शौचालयांची संख्या ५८०० होती.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांची विद्‌युत देयके थकीत असून काही शाळांची वीज जोडणी खंडीत करण्यात आली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १२६ शाळांमध्ये ३९४ वर्गखोल्या मोडकळीस आल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी २२ शाळांच्या ३० वर्गखोल्या निर्लेखित जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या विचाराधीन आहे. उर्वरित शाळांतील धोकादायक वर्गखोल्यांबाबतही आवश्यक कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये यु-डायस डाटाच्या माहितीनुसार आवश्यक असलेल्या मुलभूत भौतिक सुविधांची मागणी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकामध्ये निकषांनुसार केंद्र शासनाकडे करण्यात येते व निधी उपलब्धतेनुसार केंद्र शासनाकडून सदर बांधकामास मंजूरी दिली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वालिव, गोखिवरे, नवघर, सातिवली, चिंचपाडा (ता.वसई, जि.पालघर) भागातील नायगाव पूर्व सोपाराखाडी प्रदूषित झाल्याबाबत

**(४९) * ४१२२२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालिव, गोखिवरे, नवघर, सातिवली, चिंचपाडा (ता.वसई, जि.पालघर) भागातील औद्योगिक वसाहतीमधील तयार होणारी घातक रसायने नायगाव पूर्व सोपाराखाडीत सोडण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वसई येथील औद्योगिक खाडीत कोणतीही प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी सोडले जात असल्याने मीठ उत्पादनावर तसेच शेतीवर व खाडीतील माशांवर संकट ओढवल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घातक रसायने खाडीत सोडल्याने प्रदूषित रसायनयुक्त पाण्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य तसेच मत्स्यव्यवसायही धोक्यात आला असून खाडी प्रदूषित झाल्यामुळे भूमिपुत्रांच्या पारंपरिक मासेमारी व मीठ उत्पादनावर त्याचा परिणाम होवून अनेकांचे रोजगार बंद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाडीतील प्रदुषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन खाडी प्रदूषित करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) वसई-विरार महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले असून त्यांची अंमलबजावणी चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील भेसळयुक्त दुधाच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी शिक्षेच्या कायदयात बदल करण्याबाबत

**(५०) * ४१५५५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे : दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ३२८७४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुधात व अन्नात भेसळ करण्याचे प्रकार मागील काही वर्षापासून वाढत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून दुधात व अन्नात भेसळ करणाऱ्यांविरुध्द तसेच भेसळयुक्त दुधाच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र सरकारने फौजदारी कायद्यात बदल करण्यास राज्याला परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध भेसळ करणाऱ्या आरोपीला सहा महिन्यांपर्यंत असलेली शिक्षेची मर्यादा कमीत कमी तीन वर्षे तर जास्तीत जास्त जन्मठेपेपर्यंत करण्याचा कायदा तयार करण्यात येणार असून यासाठी कायद्यात सुधारणा करण्याकरीता सुधारणेचा मसुदा केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आल्याचे मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आश्वासन दिले असून सदर सुधारणेच्या मसुद्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने भेसळयुक्त दुधाच्या विक्री विरोधात कायदयात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच केंद्र शासनाकडून अद्याप मान्यता मिळाली नसल्यास याबाबत कशाप्रकारे पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे ?

**श्री.गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) दुधात व अन्नामध्ये भेसळ करणाऱ्यांना प्रतिबंध घालण्यासाठी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २७२ व कलम २७३ मधील अस्तित्वात असलेल्या शिक्षेमध्ये वाढ करणे तसेच सदर गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून पुरातन नाणी गहाळ झाल्याबाबत

**(५१) * ४१२८० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागातून पुरातनकालीन २१६ मौल्यवान नाणी व अन्य वस्तू गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी तत्कालिन प्रभारी कुलगुरु यांनी एक समिती गठित केली असून स्थानिक लोकप्रतिनिधींमुळे या प्रकरणाच्या चौकशीस दिरंगाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व विभागातून पुरातनकालीन २२४ मौल्यवान नाणी व अन्य वस्तू गहाळ झाल्या असून सदर बाब माहे मार्च, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींमुळे या प्रकरणाच्या चौकशीस दिरंगाई केली जात आहे, हे खरे नाही.

सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही मात्र नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कार्यकारी कुलगुरु व विभागीय आयुक्त यांनी पाच सदस्यीय समिती गठीत केली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालाची प्रत अंबाझरी पोलीस स्टेशन नागपूर येथे सादर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने पोलीस यंत्रणेव्दारा चौकशी सुरु असून पोलीस चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई (जि.ठाणे) येथील रियल इंडिया फूड्स कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५२) * ४२२०६ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई (जि.ठाणे) येथे रियल इंडिया फूड्स कंपनीने चहा पावडर बनविण्याच्या परवानगीवर फ्रुटीन नावाने मँगो ज्युसचे बेकायदेशीर बनावट उत्पादन करुन त्याची बाजारात विक्री केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ मधील कलम ६३ नुसार दिनांक २८ जून, २०१८ रोजी अलिबाग न्यायालयामध्ये मे.रॉयल इंडिया फूड्स, तळोजा एमआयडीसी, ता.पनवेल यांचेविरुद्ध विनापरवाना उत्पादन केल्याबाबत खटला दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र हागणदारीमुक्त करण्याबाबत

**(५३) * ४१९१४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्र हागणदारीमुक्त झाल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली असली तरी राज्यातील साडेपाच हजार शाळेत शौचालये नसल्याचे तर ७ हजार शाळांमधील शौचालयांचा वापरच होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाकडून ज्या योजना गावपातळीवर पोहोचत नाही त्या योजना गावपातळीवर पोहोचण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

आवश्यकता असूनही स्वतंत्र शौचालय नसणाऱ्या शाळांची संख्या २३७२ आहे. वापरात नसलेल्या शौचालयांची संख्या ५८०० होती.

(२) शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित/ विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहाय्यित अशा सर्व शाळांना स्वच्छतागृहांची नियमित देखभाल दुरूस्ती करून वापरात ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयात पाल्यांचा प्रवेश अर्ज भरताना घेतलेल्या पालकांच्या माहितीचा गैरवापर केल्याबाबत

**(५४) * ४२३०४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात पाल्यांचा प्रवेश अर्ज भरताना घेतलेल्या पालकांच्या माहितीचा शहरातील काही शाळांनी गैरवापर केल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेवर विश्वास ठेवून पालकांनी त्यांची दिलेली वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवण्याची जबाबदारी शाळेची असताना ही माहिती व्यावसायिकांना प्राप्त असून ते पालकांकडून आर्थिक लाभ मिळवतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथे राज्यातील पहिले मराठी भाषेचे विद्यापीठ सुरु करण्याबाबत

**(५५) * ४१६६१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथे राज्यातील पहिले मराठी भाषेचे विद्यापीठ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबतचा औपचारीक कार्यक्रम मा.मुख्यमंत्री यांच्याहस्ते विधान भवन, मुंबई येथे दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास संपन्न झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मराठी विद्यापिठासाठी आवश्यक त्या जागेचा ताबा अद्याप देण्यात आला नसून या विद्यापिठाची वैशिष्यपूर्ण रचना व्हावी, त्यामध्ये भाषेसाठी पोषक उपक्रम कोणते असावेत याबाबतचे नियोजनही करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वांद्रे (मुंबई) येथे मराठी विद्यापीठ कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमटे धरणातील (ता.अलिबाग, जि.रायगड) जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५६) * ४२७७३ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील उमटे धरणातून ७० गावांना पाणीपुरवठा होत असताना, मागील ४० वर्षापूर्वी हे धरण बांधताना जलशुद्धीकरण केंद्र बांधण्यात आलेले नसल्याने ग्रामस्थांना अशुध्द पाणी प्यावे लागत असल्याने जनतेने उठाव केल्यानंतर जिल्हा परिषदेने चार वर्षापूर्वी ७ कोटी रुपयांच्या जलशुद्धीकरण केंद्राच्या कामास मंजूरी देऊन सुप्रभात इन्फ्रा झोन कंपनी या ठेकेदारास काम दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने आजही जनतेस दूषित पाणी प्यावे लागत असून कामाला होत असलेल्या विलंबाबाबत रामराज येथील सरपंच तसेच ग्रामस्थांनी निदर्शने करत एक सविस्तर निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, पाणीपुरवठा अधिकारी आदींना सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

वाढीव उमटे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची एकूण अंदाजपत्रकीय किंमत रुपये ७.१० कोटी इतकी असून त्यापैकी योजनेच्या कामासाठी रुपये ६.५१ कोटी व जलशुद्धीकरण केंद्राच्या कामासाठी रुपये १.२६ कोटी इतकी रक्कम आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

उमटे नळ पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत धरणाच्या खालील बाजूस असणाऱ्या साठवण टाकीमध्ये योग्य प्रमाणात टी.सी.एल. पावडर टाकून पाणी शुद्धीकरण करुन योजनेतील समाविष्ट गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

जनतेस दूषित पाणी प्यावे लागत असल्याबाबत रामराज येथील सरपंच तसेच ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, पाणीपुरवठा अधिकारी यांना निवेदन न देता त्यांची समक्ष भेट घेऊन समस्या सांगितली आहे.

(३) रायगड जिल्हयामध्ये वाळूची उपलब्धता होत नसल्याने जलशुद्धीकरण केंद्राचे काम संथगतीने सुरु आहे.

(४) उक्त प्रकरणी चौकशी केली असता, जलशुद्धीकरण केंद्राच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य (वाळू) उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होत असल्याने सदर काम प्रलंबित होते. परंतु, सद्य:स्थितीत जलशुद्धीकरण केंद्राचे ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

योजनेचे काम संथगतीने होत असल्याने संबंधित ठेकेदारास रुपये ९,९७५/- इतका दंड आकारण्यात आला आहे. सद्य:स्थितीत योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर कारवाई करण्याबाबत

**(५७) * ४२५९९ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे प्रशासनाचा अनागोंदी कारभार, पेपर फुटी तसेच एम.ए. मराठीच्या पेपरला एक तास उशीर या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येत असून विद्यापीठात विद्यार्थी अस्वस्थ झाल्याचे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता कार्यवाही करुन विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड करणाऱ्या विद्यापीठ प्रशासनावर कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २८/०४/२०१८ रोजी व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाची Linear Algebra या विषयाची प्रश्नपत्रिका फुटल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे. तसेच दिनांक ११/०५/२०१८ रोजी एम.ए. मराठी भाग-२ या वर्गाची प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्रावर वेळेवर पोहचली नाही म्हणून विद्यापीठाकडे असलेल्या संचालक प्रत मधून सदर विषयाची प्रत काढून मुद्रणालयाकडे पाठवून ती टाईप करुन सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात आली. त्यामुळे सदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्यासाठी एक तास एवढा उशिर झाला मात्र या बदल्यात विद्यार्थ्यांना एक तासाची वेळ वाढवून देण्याच्या सूचना सर्व महाविद्यालयांना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येत असून विद्यापीठात विद्यार्थी अस्वस्थ झाल्याची बाब खरी नाही.
(२) सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. तथापि, विद्यापीठामार्फत पेपर फुटीसंदर्भात नाशिक पोलीस आयुक्त यांच्या सायबर सेलकडे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदर प्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार नाशिक जिल्ह्यातील सुमारे १८०० विद्यार्थ्यांची दिनांक १८/०५/२०१८ रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली आहे. तसेच दिनांक ११/०५/२०१८ रोजी एम.ए. मराठी भाग-२ या वर्गाच्या प्रश्नपत्रिकेला एक तास विलंब झाल्याचा प्रकार विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निदर्शनास आणून दिलेला आहे व पुढील कार्यवाहीसाठी सदर प्रकरण प्रमाद समितीपुढे सादर करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना सोयीसुविधा तसेच आर्थिक लाभ देण्याबाबत

**(५८) * ४२४१९ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयीन प्राध्यापकांना M.Phil, P.hd. करण्यासाठी ज्या सुविधा व आर्थिक लाभ मिळतात त्यासुविधा व आर्थिक लाभ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांवर कर्तव्य करणाऱ्या शिक्षकांना रजेसोबत उच्च शिक्षण घेण्याकरीता देण्याविषयी शासन निर्णय घेणार आहे काय, तसेच रजा मिळत नसल्यामुळे अनेक शिक्षकांना उच्च शिक्षण घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयीन प्राध्यापकाप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना उच्च शिक्षण घेण्याकरीता सोयी सुविधा तसेच आर्थिक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षकांकरीता आवश्यक असणारी अर्हता प्राप्त शिक्षक आता उपलब्ध आहेत. तथापि महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ च्या नियम २५ मध्ये शाळेचा एखादा कर्मचारी किंवा मुख्याध्यापक अनुक्रमे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक / व्यवस्थापक वर्ग यांच्या अनुमतीने उच्च किंवा अधिक अर्हता प्राप्त करण्याची तरतूद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या ग्रीड प्रकल्प योजनेबाबत

**(५९) * ४२४९५ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१६३ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने मराठवाडा ग्रीड प्रकल्पाची योजना सुरू करण्याकरीता इस्त्रालय देशातील कंपनीशी करार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांतर्गत शासनाने या कंपनीशी कोणता करार केला व त्याचे स्वरूप काय आहे, सदरील कंपनी कधीपासून प्रत्यक्ष कामास सुरूवात करणार आहे, तसेच सदर करारांमध्ये प्राधान्याने कोण-कोणते जिल्हे व तालुके समाविष्ट करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) शासनाने मॅकोरोट डेव्हलपमेंट या इस्त्रायल देशाच्या शासकीय कंपनीशी दिनांक १८/०१/२०१८ रोजी सामंजस्य करार व दिनांक २१/२/२०१८ रोजी सर्वकष करार केलेला आहे. तसेच इस्त्रायलच्या मॅकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस कंपनीने कामास सुरुवात केलेली असून मराठवाडा विभागाचा बृहत पाणी आराखडा व प्राथमिक संकल्पन अहवाल तयार करण्यात येणार आहे. या करारांतर्गत मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे व तालुके समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

(३) वरीलप्रमाणे इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस कंपनीने कामास सुरुवात केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंद केसरी किंवा महाराष्ट्र केसरी होणाऱ्या मल्लांना पोलीस उपअधीक्षक पदी नियुक्ती करण्याबाबत

**(६०) * ४२३९९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तीन वेळा हिंद केसरी किंवा महाराष्ट्र केसरी होणाऱ्या मल्लांना पोलीस उपनिरीक्षक ऐवजी पोलीस उपअधीक्षक पदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यांना वाढीव पेन्शन, मोफत एस.टी. प्रवास आणि आरोग्य सुविधाही देण्यात येणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घोषणेनंतर आश्वासनाची पुर्तता करण्यासाठी व राज्यातील कुस्तीला ऊर्जितावस्थेत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) होय. दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी नामांकित मल्लांसोबत झालेल्या बैठकीत हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त मल्लांना वाढीव मानधन देणे, त्यांना एस.टी. प्रवास सवलत व वैद्यकीय सुविधा लागू करण्याकरीता संबंधित विभागांनी कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी आदेशित केले आहे. यानुषंगाने आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवाल तपासण्यात येत आहे. तसेच उपरोक्त मल्लांना आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याकरीता कार्यवाही करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हयात अपंग युनिट शिक्षण भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६१) * ४२६११ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयात अपंग युनिट शिक्षण भरती प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याकरीता एस.आय.टी. समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अहवालानुसार प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे, दिनांक २१/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी पथक नेमण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देगलूर (जि.नांदेड) शहरात मिनरल वॉटरच्या व्यवसायावर नियंत्रण घालण्याबाबत

**(६२) * ४३४४८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) शहरात मिनरल वॉटरचा व्यवसाय सुरु असून पाण्याच्या नावावर प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रंगीत, शेवाळयुक्त, अळयायुक्त पाण्याचा पुरवठा केला जात असल्याचे दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून दूषित पाण्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशुध्द पाण्याच्या व्यवसायाला नियंत्रण घालण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही. तथापि या आशयाबाबतची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: भोकर (ता.जि.नांदेड) येथे गुटखा विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(६३) * ४३५६८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: भोकर (ता.जि.नांदेड) येथे गुटखा विक्री सुरु असून विभागाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने मुंबईतील जोगेश्वरी, नालासोपारा, वाशी, सांताक्रुझ, अंधेरी व भिवंडी येथे गुटख्यांची मोठी गोदामे असून सदर ठिकाणी रुपये २० कोटी गुटख्यांचा साठा असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रसायन मिश्रित आरोग्यास घातक असलेल्या गुटख्यामुळे अनेकांचा मृत्यू झाला असून शासनाने गुटखा विक्रीवर बंदी घातली असूनही गुटखा सहज उपलब्ध होत असून भोकर शहरात त्याची जादा दराने विक्री होत आहे, तसेच गुटखा तस्करांशी आर्थिक संबंध असणारे पोलीस, अन्न व औषध प्रशासन, आरटीओ चेकपोस्ट या सर्व अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच राज्यात गुटख्याची तस्करी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गुटखा विक्रीवर बंदी घालण्याबाबत कार्यवाही करुन सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी व गुटखा तस्कारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. तथापि, प्राप्त तक्रारींवर शासनस्तरावर चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयातील हमाल-माथाडी कामगारांनी बेमुदत धरणे आंदोलन केल्याबाबत

**(६४) * ४२६८२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्यावतीने विविध मागण्यांसाठी हमाल व माथाडी कामगारांनी दिनांक ७ मे, २०१८ रोजी पासून साखळी पध्दतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ ते ३० एप्रिल, २०१८ या कालावधीची लेव्हीसह निश्चित हमाली गोदामनिहाय माथाडी मंडळाकडे जमा करणे इत्यादी विविध मागण्यांसाठी सुरु असलेल्या आंदोलनाबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाकडून दिनांक ७ मे, २०१८ पासून गोदाम निहाय प्रतिनिधींचे बेमुदत धरणे आयोजित करण्यात आले होते, परंतु दिनांक ८ मे, २०१८ रोजी जिल्हाधिकारी यांनी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार सदर उपोषण स्थगित करण्यात आले.

(२) व (३) सदर प्रकरणी शासकीय धान्य गोदाम हमाल पंचायत, बीड यांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ८२४३/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी आदेश पारित केले आहेत. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नालासोपारा (जि.पालघर) येथे असंख्य प्राचीन पुरावशेष गाव वस्त्यांमध्ये पडून असल्याबाबत

**(६५) * ४१९४१ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) येथे असंख्य प्राचीन पुरावशेष गाव वस्त्यांमध्ये बेवारस पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील नालासोपाऱ्यामध्ये प्राचीन पुरावशेष विखुर्ले पडून असल्याबाबत सन २०१६-१७ मध्ये या विभागाच्या अधिपत्याखालील पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय या कार्यालयास अर्ज प्राप्त झाले होते. माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सदर विषयाबाबत कुठलेही अर्ज प्राप्त झालेले नाही.

(२) सन २०१६-१७ मध्ये प्राप्त अर्जानुसार मार्च, २०१७ मध्ये पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय या कार्यालयामार्फत पाहणी करण्यात आली होती. पालघर जिल्ह्यातील नालासोपाऱ्यामधील सुटया शिल्पांना एकत्रित करून त्यांचे संग्रहालय (City Musuem) बनविण्यात यावे, यासाठी वसई विरार महानगरपालिका यांना विनंती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानांतर्गत प्रकल्पासाठीचा निधी मुंबई विद्यापीठाला देण्याबाबत

**(६६) * ४३६३५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानांतर्गत प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्याकडून देण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील निधी मुंबई विद्यापीठाला प्राप्त झाला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निधी केंद्राकडून प्राप्त झाल्यानंतर शासनाने इतर नऊ विद्यापीठांना निधीचे वाटप केले, असून मुंबई विद्यापीठास अद्याप निधी देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबई विद्यापीठाला निधी वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) मुंबई विद्यापीठाने उपयोगिता प्रमाणपत्र उशिराने सादर केल्यामुळे त्यांना इतर विद्यापीठांबरोबर निधीचे वितरण न करता उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधीचे वितरण करण्यात आले आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(६७) * ४२३८६ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ३५५३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनेत माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी श्री.सत्यवान सोनवणे यांनी शासन आदेशाचे उल्लंघन केल्याचे चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवाल चौकशी अधिकारी श्री.अनिलकुमार नवाळे, प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा, जि.प. सोलापूर यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांच्याकडे सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री.सत्यवान सोनवणे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) या प्रकरणी शासनाने संबंधित अधिकारी यांची बदली शिक्षणाधिकारी (निरंतर), जि.प. उस्मानाबाद या अकार्यकारी पदावर केली आहे. या प्रकरणी पुढील शिस्तभंग विषयक कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाळा व वर्ग तुकड्यांची पुर्नतपासणी करुन अनुदान देण्याबाबत

**(६८) * ४१३९८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांपैकी दिनांक ९ मे, २०१८ रोजी ५१ माध्यमिक शाळा व १९ माध्यमिक शाळेतील ५४ वर्ग तुकड्या मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेस अनुसरून वगळण्यात आल्या असून सदर शाळांच्या याचिकेत असलेल्या मुद्यांची तपासणी करून अनुदान देण्याची मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शाळा व वर्ग तुकड्या यांची पुर्नतपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) या संदर्भात आयुक्त (शिक्षण) यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यापीठांमध्ये तसेच महाविद्यालयात तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना एकसमान मानधन मिळण्याबाबत

**(६९) * ४२२८० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४१७ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील विद्यापीठांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या रिक्त असलेल्या जागांवर तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनाचा प्रश्न यंदाच्या अर्थसंकल्पातही मंजूर करण्यात आला नसल्याचे माहे मार्च, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तासिका प्राध्यापकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मानधन निश्चित करण्यात आले असून पारंपारिक महाविद्यालय आणि तत्सम महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना रुपये २५०/-, तंत्रनिकेतन महाविद्यालयासाठी रुपये ५००/- तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयासाठी रुपये ८००/- प्रति तासिका दिले जात असल्यामुळे विभागाकडून अशाप्रकारचा दुजाभाव होत असल्याने सर्व तासिका प्राध्यापकांनी एकसमान मानधन मिळावे अशी मागणी संबंधित विभागाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व तासिका प्राध्यापकांना एकसमान मानधन मिळण्याबाबत तसेच रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांसाठी कार्यरत तासिका तत्त्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात वाढ करण्याबाबत दिनांक १७/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांसाठी कार्यरत तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या मानधनाच्या दरात वाढ करणेबाबत मागणी प्राप्त झाली आहे.

(३) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांसाठी कार्यरत असलेल्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाच्या दरात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा सुरु करण्याबाबत

**(७०) * ४२७४६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६१४५ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्याप्रमाणे राज्य शिक्षण मंडळ, केंद्रीय माध्यमिक मंडळ (सीबीएसई) आणि अन्य माध्यमिक मंडळाच्या शाळा चालविल्या जातात त्याच धर्तीवर शिशुवर्गापासून ते इयत्ता बारावीपर्यंत १०० आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा चालविण्याचा निर्णय घेतला असून येत्या शैक्षणिक वर्षापासून त्यापैकी १३ जिल्ह्यात १३ शाळा सुरु करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये कोणकोणत्या प्राथमिक मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, तसेच पहिल्या टप्प्यात सुरु करावयाच्या १३ जिल्हयांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली वा विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कोणत्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच, उपरोक्त १०० आंतरराष्ट्रीय शाळांपैकी प्रत्येकी किती शाळा इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, तेलगु, कन्नड व तामिळ माध्यमातील असणार आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याचा शासन निर्णय क्र. शैगुव २०१७/प्र.क्र.१५२/१७/एसडी-६ दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ नुसार घेण्यात आलेला असून त्यानुसार आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा तयार करण्यासाठी शाळा निवडीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

शासन निर्णय ५ मे, २०१८ अन्वये जिल्हा परिषद शाळांमधून १३ ओजस शाळांची निवड करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तंत्रशिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७१) * ४१५१३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७२५ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व आस्थापना, पदवी/पदविका संस्थांमधील गट अ व गट ब मधील पदांची बिंदूनामावली सुधारित स्वरुपात व ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची तंत्रशिक्षण संचालनालयस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वित्त विभागाच्या दिनांक २९ जून, २०१७ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (AICTE) सन २०१८-१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या कार्यपध्दती पुस्तिकेतील सूचनांच्या अनुषंगाने शासकीय/अशासकीय संस्थांमधील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही विभागीयस्तरावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित स्वरुपातील बिंदुनामावली अस्तित्वात येण्यापूर्वीच्या कालावधीत प्रमाणित झालेल्या व शासनाकडून सादर करण्यात आलेल्या मागणीपत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या/होणाऱ्या शिफारशींनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तंत्रशिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतने यांमधील गट-अ व गट-ब संवर्गातील बिंदूनामावल्या ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने शासनास सादर करण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालनालयस्तरावर अद्याप सुरु आहे. ज्या विद्याशाखेतील अध्यापकांच्या बिंदूनामावल्या शासनास ऑफलाईन व ऑनलाईन स्वरूपात प्राप्त झाल्या आहेत, त्या सामान्य प्रशासन विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

(२) होय.

शासकीय अभियांत्रिकी संस्थांमधील पदांच्या आकृतिबंधाची पडताळणी करून वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतने यांमधील नियुक्त्या देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. ज्या नियुक्त्यांसंदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवली आहेत, त्या अद्याप प्रलंबित आहेत.

(४) व (५) सर्व शासकीय / शासन अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतने यांमधील पदांचा सुधारीत आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही अद्याप सुरू असून तद्‌नंतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## लोककलावंताचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत

**(७२) * ४१२७८ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोककला पथकांना शासन निर्णयानुसार दरवर्षी प्रायोगिक अनुदान मिळण्याची तरतूद माहे जानेवारी, २००८ पासून सुरु असूनही अनुदान शिफारस समितीची बैठक दरवर्षी होत नसल्याने लोककला पथकांनी पाठविलेले अर्ज बिना कार्यवाही असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात २६ कलापथकांना ४८.८० लाखांचे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली मात्र प्रत्यक्षात हे अनुदान सन २०१६-१७ करीता असून सदर अनुदान माहे मार्च, २०१८ पर्यंत जमा होणे अपेक्षित होते परंतु एप्रिल महिना उलटूनही अदयापी लोककलावंत अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार लोककलावंताचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७३) * ४१६८० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९४१ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अन्न व औषध प्रशासन विभागाकडे खादयपदार्थ व औषधे यांची गुणवत्ता तपासण्यासाठी निरीक्षकांची संख्या कमी असल्याने भेसळयुक्त तक्रारीच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात फक्त २६५ निरीक्षक सेवेत असल्यामुळे त्याचा कामकाजावर परिणाम होत असून सदर विभागात निरीक्षकांची संख्या वाढविण्याची अशी मागणी शासनाच्या वित्त विभागाला करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढत्या भेसळयुक्त तक्रारीच्या अनुषंगाने उक्त प्रश्नांची दखल घेऊन अन्न व औषधे विभागातील निरीक्षकांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अन्न व औषध प्रशासनात सद्य:स्थितीत २६५ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत. अन्न व औषध प्रशासनातील अन्न, औषध, प्रयोगशाळा व अन्य विभागांकरीता मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत मंजूर पदे ११७४ असून नवीन प्रस्तावित पदे ७३८ आहेत. अशा रितीने एकूण १९१२ पदांचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. सदर सुधारित आकृतिबंधाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# शालेय विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी राबविण्यात आलेल्या शिष्यवृत्तीबाबत

**(७४) * ४१२४५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेस विद्यार्थ्यांनी अत्यल्प प्रतिसाद दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी या परिक्षेकरीता राज्यभरातून १५ लाख विद्यार्थी बसले होते, परंतु यावर्षी याच परिक्षेकरीता ८ लाख विद्यार्थी बसले असून शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्तीची रक्कम तुटपुंजी असल्याने पालकांसह विद्यार्थ्यांनी उक्त परिक्षेविषयी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

सन २०१७-१८ च्या इ. ५ वी व इ. ८ वी करीता असणाऱ्या शिष्यवृत्तीची माहिती व महत्त्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहचण्याकरीता किशोर, जीवन संक्रमण व शिक्षण संक्रमण अशा मासिकातून लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रिय अधिकारी यांच्या बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करुन मुख्याध्यापकांचे उद्बोधन करणे अशा प्रकारे परीक्षा परिषदेकडून उपक्रम राबवून सदर शिष्यवृत्ती परीक्षेकरीता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करणेबाबत अद्यापि निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ऑनलाईन औषध विक्रीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(७५) * ४२२४७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.प्रसाद लाड, श्री.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०९१ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन औषध विक्रीला बंदी असतांना www.omsi.in, m.medilife.com व इतर संकेतस्थळांवर औषधांची विक्री होत असून यामध्ये गर्भपाताच्या (एमटीपी) गोळ्यांची बेकायदेशीरपणे विक्री केली जात असल्याचे केमिस्ट असोसिएशनच्या माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यात ऑनलाईन औषध विक्रीमध्ये रुग्णांना मदत होत नसून नियंत्रणाच्या अभावामुळे त्यांची फसवणूक होत असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन औषध विक्रीचा परवाना न घेता ऑनलाईन औषध विक्रीच्या जाहिराती प्रसिध्द केल्या जात असून सोशल मिडीयाचा वापर करुन गर्भपात, नशेच्या व आरोग्यास घातक औषधांच्या ऑनलाईन उपलब्धतेबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रारी करून व मा.उच्च न्यायालयाने याबाबत अन्न व औषध विभागास आदेश दिले असतानाही याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्यास शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गर्भपाताच्या गोळया ऑनलाईन विकणाऱ्यांविरोधात महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनने शासनाकडे लेखी तक्रार दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यंत किती ऑनलाईन विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली तसेच ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या कंपन्या आणि प्रत्यक्ष औषध विक्री करणारा विक्रेता यामध्ये अव्यापारी स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ऑनलाईन व बेकायदेशीर औषध विक्रीवर प्रतिबंध करण्याबाबत तसेच गर्भपाताची ऑनलाईन होत असलेली औषध विक्री थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या औषधे व सौंदर्यप्रसाधने कायद्यामध्ये औषधाची विक्री ऑनलाईन पद्धतीने करण्याची तरतूद नाही. राज्यात ऑनलाईन औषध विक्रीमध्ये रुग्णांना मदत होत नसून नियंत्रणाच्या अभावामुळे त्यांची फसवणूक होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) मागील ०३ वर्षात एकुण ०७ प्रकरणी प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आले असून १४ पुरवठादारांचे परवाने रद्द, ०६ पुरवठादारांचे परवाने निलंबित, ०४ प्रकरणी न्यायालयात खटले दाखल, ०३ प्रकरणी पुरवठादारानी व्यवसाय बंद केला असल्यामुळे त्यांचे परवाने रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. १० प्रकरणी पुरवठादार इतर राज्यातील असल्याने कारवाईस्तव संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकास कळविण्यात आले आहे. ०४ प्रकरणी तपास/कारवाई सुरू आहे.

(५) होय, केंद्र शासनाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन केलेल्या उपसमितीने केंद्र शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने कायदयात बदल करण्यासाठी एप्रिल, २०१८ मध्ये अधिसूचना जारी करून सर्व संबंधितांकडून अभिप्राय मागितले आहे. तरीसुद्धा सद्यःस्थितीत प्रचलित पद्धतीनुसार बेकायदेशीर औषधे विक्री करणाऱ्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीला भाडेतत्वावर दिलेल्या जागेचे नुतनीकरण करण्याबाबत

**(७६) * ४२४६४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) फिल्म सिटीमधील ३३ एकर जागा शासनाने बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीला सन १९८३ मध्ये संशोधनासाठी भाडेतत्वावर दिलेली असून सदरहू जागेचे राज्य शासनाकडून दरवर्षी नुतनीकरण केले जाते परंतू मागील ३ वर्षापासून सदरहू जागेचे शासनाकडून नुतनीकरण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयात भाडेपट्टीने दिलेल्या किती शासकीय जमिनींच्या करारांचे नुतनीकरण करणे किती कालावधीपासून प्रलंबित आहे,

(३) असल्यास, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या ताब्यात असलेली जागा फिल्म टुरिझम प्रकल्पासाठी देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीला भाडेतत्वावर दिलेल्या जागेचे नुतनीकरण करण्याबाबत कार्यवाही करुन नुतनीकरण न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कळविल्यानुसार मुंबई शहर जिल्हयात एकूण १३०७ शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकती असून दिनांक ०१/०१/२०१८ पर्यंत ६८७ मिळकतींचा भाडेपट्टा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यापैकी ९

मिळकतीचे भाडेपट्टयाचे नुतनीकरण झाले असून उर्वरीत ६७८ मिळकतीचे नुतनीकरणाची कार्यवाही महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १२/१२/२०१२ च्या तरतुदीनुसार सुरु आहे.

तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कळविल्यानुसार, मुंबई उपनगर जिल्ह्यात एकूण ३५६ शासकीय भाडेपट्टयाच्या मिळकती असून दिनांक ०१/०१/२०१८ पर्यंत १४९ मिळकतींचा भाडेपट्टा कालावधी संपुष्टात आला आहे. सदर मिळकतीचे नुतनीकरणाची कार्यवाही महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १२/१२/२०१२ च्या तरतुदीनुसार सुरु आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील मेडिकल चालकांवर कारवाई करण्याबाबत

**(७७) * ४२६०० श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मेडिकल दुकानांमध्ये प्रशिक्षित व्यक्ती नसणे, औषधांच्या साठवणुकीसाठी पुरेशी यंत्रणा न ठेवणे, चुकीचे लेबल लावून औषध विकणे, विनापरवाना गुंगी येणारी औषधे विकणे आदी प्रकार सुरू असून या कारणास्तव ९८ मेडिकल चालकांना अन्न व औषध प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार औषध विक्रीमध्ये गैरप्रकार करणाऱ्या मेडिकल चालकांना नोटीस पाठवल्यानंतर त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे. ९६ मेडिकल दुकानांविरुद्ध औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ६६५ औषधे विक्री परवाना धारकांची तपासणी केली. त्यापैकी ९६ प्रकरणांमध्ये औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या पेढ्यांपैकी ७९ औषधी विक्रेत्यांची अनुज्ञप्ती ठराविक कालावधीसाठी निलंबित करण्यात आली असून १७ अनुज्ञप्ती धारकांची अनुज्ञप्ती रद्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता वेगवेगळी करण्याबाबत

**(७८) * ४२४२६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता वेगवेगळी होत नसल्यामुळे राज्यातील अनेक शिक्षकांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता वेगवेगळी होण्याकरीता अनेकांनी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता वेगवेगळी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही,

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संच मान्यता वेगवेगळी होते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रोळी (मुंबई) येथील पूर्व द्रुतगती महामार्गावर दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिका रस्त्यावर सापडल्याबाबत

**(७९) * ४२५०९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (मुंबई) येथील पूर्व द्रुतगती महामार्गावर दहावी व बारावीच्या ४०० ते ५०० उत्तरपत्रिका माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान रस्त्यावर सापडल्याने पालक वर्गासह शिक्षण विभाग त्रस्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी दिवसरात्र मेहनत घेवुन अभ्यास करतात तसेच पालक कष्ट करुन आपल्या मुलांना शिकवतात परंतु शिक्षण विभागाच्या अनागोंदी नियोजनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिशय कडक बंदोबस्तात एका केंद्रातुन दुसऱ्या केंद्रावर नेण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिका रस्त्यावर सापडतात कशा याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) दिनांक १७/०३/२०१८ रोजी विक्रोळी येथे २० उत्तरपत्रिका व ३०० पुरवण्या सापडल्याची घटना घडली होती.

(२) व (३) सदर उत्तरपत्रिका/पुरवण्या या जुन्या, कोऱ्या व वापरातून बाद झालेल्या होत्या. विभागीय मंडळातील जुने अभिलेख पल्पींगसाठी खाजगी कंत्राटदारांकडे देण्यात आले होते. सदर कामामध्ये कंत्राटदारांकडून आवश्यक खबरदारी घेण्यात आली नाही. यामुळे या कंत्राटदारास काळया यादीमध्ये टाकण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिंगायत समाजास अल्पसंख्यांक दर्जाच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत

**(८०) * ४२५५२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५०८ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माची मान्यता मिळावी तसेच शासन मान्यता व राष्ट्रीयस्तरावर अल्पसंख्यांक दर्जा मिळावा यासाठी ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी या मागणीसह अन्य मागण्याबाबत समाजातील ३५० जाती-पोटजाती मधील बांधवानी दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी कोल्हापूर येथे तसेच दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयावर लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंगायत समाजास अल्पसंख्यांक दर्जा देण्याबाबतच्या विनंतीची विविध संघटनांची निवेदने माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये केंद्र शासनास पाठविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिंगायत समाजाने दिलेल्या निवेदनाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या मोर्चाची दखल घेऊन समाजाला अल्पसंख्यांक दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) निवेदनातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-
   (१) लिंगायत धर्माला संविधानिक मान्यता प्रदान करावी.
   (२) लिंगायत धर्मीयांना राष्ट्रीयस्तरावर अल्पसंख्यांक दर्जा देण्यात यावा.
   (३) सन २०२१ मध्ये होणाऱ्या भारताच्या जणगणनेत लिंगायत धर्माच्या लोकसंख्येची वेगळा कॉलम देवून स्वतंत्र जणगणना करण्यात यावी.
(४) लिंगायत समाजास अल्पसंख्यांक दर्जा देण्याबाबतच्या विविध संघटनांची निवेदने दिनांक १५/०९/२०१४ च्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठविण्यात आली आहेत. तत्पुर्वी अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे दिनांक १३/०५/२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहेत व त्यामध्ये वीरशैव लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. तसेच महारजिष्ट्रार, गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १४/११/२०१३ च्या पत्रान्वये, वीरशैव/लिंगायत हा हिंदू धर्माचा पंथ असल्याने, सन २०११ च्या जनगणनेमध्ये लिंगायत समाजाची स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही, असे नमूद केले आहे. सबब, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्यांक दर्जा देणे अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भालेर (ता.जि.नंदुरबार) येथे एस.एस.सी. परीक्षा केंद्र सुरु करण्याबाबत

**(८१) * ४२६१२ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भालेर (ता.जि.नंदुरबार) येथे विदयार्थी संख्येमुळे एस.एस.सी. परीक्षा केंद्र सुरु करण्यासाठी शिक्षण अधिकारी यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असून सुध्दा उक्त ठिकाणी एस.एस.सी. परीक्षा केंद्र सुरु करण्यात न आल्याने विदयार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भालेर (ता.जि.नंदुरबार) येथे एस.एस.सी. परीक्षा केंद्र सुरु करण्यासाठी कार्यवाही करुन याबाबत दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी दिनांक १७/११/२०१७ च्या पत्रान्वये भालेर, जि.नंदुरबार येथे नविन परीक्षा केंद्र निर्मितीचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि, त्यानंतर दिनांक १८/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नवीन परीक्षा केंद्राबाबत कोणतीही कार्यवाही करु नये, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी नाशिक विभागीय मंडळास कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर विद्यापिठाच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत

**(८२) * ४३७४४ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर विद्यापीठातील बीबीए व्दितीय वर्षाच्या चौथ्या सत्रातील इंटरनॅशनल बिझनेस व ऑर्गनायझेशन बिहेविअर या दोन विषयांची पुर्नपरीक्षा विद्यापीठाच्या एका प्राध्यापकाने पेपर सेटींग केल्याच्या चुकीमुळे घेण्याच्या निर्णयाविरोधात हिरांचद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, संगमेश्वर आणि मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाविरोधात दिनांक ९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिक्षार्थी विद्यार्थ्यांची यामध्ये चुक नसतांना विद्यार्थ्यांना पुर्नपरीक्षा दयावी लागत असून दोषी प्राध्यापकांवर कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर विद्यापीठाच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत कार्यवाही करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही, हे खरे नाही. तथापि, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सदर विद्यार्थ्यांनी विद्यापीठास याबाबत निवेदन दिलेले आहे.
(२) व (३) सोलापूर विद्यापीठाने सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तातडीची बाब म्हणून समिती गठीत करुन समितीच्या शिफारशीनुसार संबंधित अध्यापकावर कारवाई करण्यासंदर्भातील प्रकरण परीक्षा प्रमाद समितीकडे सादर करण्यात आले. परीक्षा प्रमाद समितीने संबंधित अध्यापकावर कारवाई करण्याची कुलगुरुंकडे शिफारस केली होती. त्यास अनुसरुन कुलगुरुंच्या मान्यतेने दिनांक २४/०५/२०१८ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच सोलापूर विद्यापीठाने संबंधित विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता सदर प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी दिनांक १०/०५/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये पुर्नपरीक्षा घेण्याचा व सदर परिक्षेच्या निकालासंदर्भात बेस्ट ऑफ २ पर्याय लागू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून सदर निर्णयास अनुसरुन कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.